अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com शुक्रवार दि. १६ डिसेंबर २०२२ ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ८० वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# शेतकऱ्यांसाठी डबल इंजिन सरकारचा डबल धमाका

## अतिवृष्टी-अवकाळी; भरपाई डबल

सुराज्य/मुंबई

**अतिवृष्टी, अवकाळी पाऊस अशा दुष्टचक्रात सापडलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना शिंदे-फडणवीस सरकारने पुन्हा एकदा दिलासा दिला आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या नुकसान भरपाईच्या रकमेत प्रति हेक्टर दुपटीने वाढ करण्यात आली आहे. राज्यशासनाने हा निर्णय जाहीर केला असून त्याबाबतचा आदेश गुरूवारी काढण्यात आला आहे.**



या निर्णयानुसार जिरायत पिकाच्या नुकसानीसाठी ६ हजार ८०० रुपयांऐवजी आता १३ हजार ६०० रुपये मिळणार आहेत. बागायत पिकांच्या नुकसानीसाठी १३ हजार ५०० ऐवजी आता २७ हजार रुपये मिळणार आहेत. बहुवार्षिक पिकाच्या नुकसानीसाठी १८ हजार ऐवजी आता मिळणार ३६ हजार रुपये मिळणार आहेत.

सरकारने नुकसानीची मर्यादाही वाढवली आहे. दोन हेक्टरऐवजी तीन हेक्टरपर्यंत मदत मिळणार असल्याचे या शासन निर्णयात म्हटले आहे. राज्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे आणि शेतजमिनींचे मोठे नुकसान झाले होते. बाधित शेतकऱ्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून पिके आणि शेतजमिनीच्या नुकसानीसाठी २२२३२.४५ लाख रुपये इतका निधी वितरित करण्यास सरकारने मंजुरी दिली आहे. येत्या हिवाळी अधिवेशनात या निधीची तरतूद पुरवणी मागण्याद्वारे करण्यात येईल. त्यानुसार हा निधी विभागीय आयुक्तांना किंवा शासनाचे आदेश येतील त्याप्रमाणे वितरित करण्याचे आदेश दिले जाणार आहेत. जून ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत अतिवृष्टी आणि पुरामुळं राज्यातील विविध जिल्ह्यात झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी वाढीव दराने मदत देण्याबाबत महसूल विभागाने शासन निर्णय घेतला आहे.

यानुसार आता शेतकऱ्यांना जिरायत पिकाच्या नुकसानीसाठी ६ हजार ८०० रुपयांऐवजी आता १३ हजार ६०० रुपये मिळणार आहेत. तर बागायत पिकांच्या नुकसानीसाठी १३ हजार ५०० ऐवजी आता २७ हजार रुपये मदत शेतकऱ्यांना मिळणार आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

शासन निर्णयात म्हटले आहे की, पंचनामे करण्यात आल्यानंतर लाभार्थी निश्चित करण्यात यावेत. या शासन निर्णयानुसार संपूर्ण रक्कम बीम्स प्रणालीवर वितरित करण्यात येत असली तरी लाभार्थी निश्चित झाल्यानंतर वित्तीय शिस्तीच्या दृष्टिकोनातून संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष गरजेनुसारच कोषागारातून रक्कम आहरित करून त्यानंतरच शासन निश्चित करेल अशा पद्धतीने लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यामध्ये ऑनलाईन पद्धतीने रक्कम हस्तांतरित करावी, असेही शासन निर्णयात म्हटले आहे.

## उजनीचे नियोजन : मिळणार पाचवी पाळी

सुराज्य/सोलापूर



उजनी धरणातून शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी सन २०२३ वर्षातील पाणी वाटपाचे नियोजन झाले आहे. पाटबंधारे विभागाच्या वतीने ३० जून २०२३ पर्यंत ४ आवर्तने सोडण्याचे नियोजन केले होते मात्र योग्य नियोजन करून कालव्याची ४ ऐवजी ५ आवर्तने द्यावीत, तसेच नदीमध्ये सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या वेळी काही दिवसांसाठी नदीकाठच्या गावांचा कृषीपंपांचा वीजपुरवठा बंद करावा, परिणामी अवैध पाणी उपसा होणार नाही, असे आदेश दिले. १५ जानेवारी २०२३ पासून या नव्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

उजनी प्रकल्प कालवा सल्लागार समिती बैठक सोलापूरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन येथे पार पडली. रब्बी हंगामातील कालवा आणि नदीमध्ये सोडण्यात येणाऱ्या पाण्याचे नियोजन या बैठकीत करण्यात आले. बैठकीस पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत, आ. सुभाष देशमुख, संजय शिंदे, सचिन कल्याणशेट्टी, समाधान आवताडे, कल्याणराव काळे, विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता (वि. प्र.) हेमंत धुमाळ, अधीक्षक अभियंता धीरज साळे उपस्थित होते.

प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना आणि कोल्हापूर पद्धतीचे बंधारे यांच्यावरील पाणीपट्टी वसुली तसेच त्याबाबतचे व्यवस्थापन करणे वाढत्या सिंचन क्षेत्रामुळे व मनुष्यबळाच्या मर्यादेमुळे पाटबंधारे विभागाला कठीण जात आहे. त्यामुळे ते व्यवस्थापनासाठी साखर कारखान्यांकडे हस्तांतरित करण्याचा पर्याय अवलंबावा अशा सूचना पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या. सोलापूर महानगरपालिकेला पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात नदीत पाणी सोडावे लागते. महापालिकेला थेट पाणी देण्यासाठी नवीन पाईपलाईनच्या कामास गती देण्यासाठी लवकरच बैठक घेण्यात येणार असल्याचे विखे-पाटील यांनी सांगितले. पाण्याचा कार्यक्षम वापर व्हावा तसेच सिंचनासाठी अधिक पाणी उपलब्ध व्हावे यासाठी जलाशयातील बाष्पीभवन कमी करण्याच्यादृष्टीने शास्त्रीय पद्धतीने उपाययोजना करण्याच्या सूचना मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी दिल्या.

### कोल्हापूर पध्दतीचे बंधारे साखर कारखान्याकडे

दहिगाव उपसा सिंचन योजना आणि सीना माढा उपसा सिंचन योजना या दोन योजना तसेच भीमा, सीना आणि माण नदीवरील ५० कोल्हापूर पद्धतीचे बंधारे संपूर्ण व्यवस्थापनासाठी साखर कारखान्यांकडे हस्तांतरित करण्याबाबत अभ्यास करून प्रस्ताव सादर करण्यात येईल, असे मुख्य अभियंता धुमाळ यांनी सांगितले.

### असे आहे नियोजन

- उजनी (भीमा) प्रकल्प उजवा कालवा आणि डावा कालवा या दोन्ही कालव्याचे रब्बीचे पहिले आवर्तन १५ जानेवारी २०२३ पासून
- भीमा सीना जोड कालव्यातून २० डिसेंबर २०२२ ते २० जानेवारी २०२३ दरम्यान पहिले आवर्तन सोडण्यात येणार
- भीमा नदीत १० जानेवारी २०२३ रोजी सोडलेले पाणी सोलापूर महानगरपालिका, पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला नगरपालिका व भीमा नदी तीरावरील ग्रामीण पाणीपुरवठा योजनांसाठी हिळ्ळी बंधाऱ्यापर्यंत सोडले जाणार
- सीना माढा उपसा सिंचन योजना तसेच दहिगाव उपसा सिंचन योजनेतून ५ जानेवारी २०२३ रोजी पाणी सोडण्यात येणार

## शैक्षणिक संस्थांवरील सीलबंदची कारवाई बेकायदेशीर

### महेश कोठे, विजय गव्हाणे यांचा दावा

सुराज्य/सोलापूर



शैक्षणिक संस्थांना शासनाने चारिटीखाली मनपा कर माफी केलेली आहे असे असतानाही महापालिकेकडून सोलापूर शहरातील कर थकबाकीदार शैक्षणिक संस्था सील करण्याची कारवाई सुरू असून ही कारवाई बेकायदेशिर असल्याचा दावा माजी महापौर महेश कोठे आणि राज्य शिक्षणसंस्थाचालक महामंडळाचे सचिव विजय गव्हाणे यांनी केला आहे.

महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्था महामंडळाचे सरचिटणीस गव्हाणे यांच्या उपस्थितीत महेश कोठे यांनी गुरूवारी मनपा उपायुक्त डॉ . विद्या पोळ यांची भेट घेतली. कर थकबाकीसाठी महापालिकेने शाळा सील करण्याची सुरू केलेली कारवाई थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली. चारिटी कायद्याखाली शैक्षणिक संस्थांना शासनाने महापालिका कर माफी केलेली आहे असे असतानाही कारवाई करणे चुकीचे आहे, असे कोठे आणि गव्हाणे म्हणाले. परभणी, अकोला महापालिकेने त्यांच्या क्षेत्रातील शैक्षिणक संस्थांचे कर माफ केल्याचेही त्यांनी सांगितले.

### ... तर आयुक्तांसह टीमवर गुन्हा दाखल करू : कोठे



महापालिकेने शैक्षणिक संस्थांवरील कारवाई बेकायदेशिर आहे. ही कारवाई न थांबवल्यास आयुक्तांसह टीमवर गुन्हा दाखल करण्यात येईल, अवमान याचिका दाखल करण्यात येईल असेही कोठे यांनी स्पष्ट केले.

### महापालिकेची कारवाई सुरूच राहिल



महापालिका आयुक्तांनी कर सवलतीचा आदेश रद्द केलेला आहे. त्यामुळे महापालिकेने कर थकबाकीदार व्यावसायिक शाळांवर कारवाई सुरू केलेली आहे. मागील वर्षीच महापालिकेने सर्व शैक्षणिक संस्थांना कर्जमाफी रद्द केल्याचे पत्र दिलेले आहे. महापालिकेने थकबाकीदार शाळा सीलची कारवाई सुरू केली आहे. परंतु शाळांमधील ज्ञानार्जन, विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद केलेले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान देखील होत नाही. त्यामुळे महापालिकेची कारवाई सुरूच राहिल, असे उपायुक्त विद्या पोळ यांनी सांगितले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



लवकर उठा, नाही तर तुमच्या सकट खुर्ची सील करतील!!

कल्याण
279-87-449

मेन बाजार
146-10-389

## राज्यात हिंदुजा समूहाची ३५ हजार कोटींची गुंतवणूक



मुंबई : महाराष्ट्रात उद्योगांनी गुंतवणुकीसाठी पुढे यावे, या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या आवाहनाला जगभरातील विविध उद्योजकांसह उद्योग समूहांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. हिंदुजा समूहाने गुरुवारी महाराष्ट्रात विविध ११ क्षेत्रांमध्ये सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा राज्य शासनाबरोबर सामंजस्य करार केला. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

वर्षा' निवासस्थानी झालेल्या बैठकीस हिंदुजा ग्रुपचे जी. पी. हिंदुजा, अशोक हिंदुजा, प्रकाश हिंदुजा, माजी आमदार कॅप्टन अभिजित अडसूळ, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. अत्यंत कमी कालावधीत हा सामंजस्य करार होत असल्याचे सांगून मुख्यमंत्री शिंदे यांनी महाराष्ट्रातील भूमिपुत्र म्हणून हिंदुजा समूहाने या गुंतवणुकीसाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल कौतुक केले. नवीकरणीय ऊर्जा, माध्यमे आणि मनोरंजन, ग्रामीण आर्थिक विकास, सायबर सुरक्षा, व्यावसायिक ऑटोमोबाईल्स, बँकिंग- फायनान्स, आरोग्य, पायाभूत सुविधा, शिक्षण, उत्पादन आणि नव तंत्रज्ञान या ११ क्षेत्रांत हा उद्योग समूह गुंतवणूक करणार आहे. दोन दिवसांपूर्वी शासनाने ७० हजार कोटींच्या गुंतवणुकीच्या प्रस्तावांना मंत्रिमंडळ उपसमितीने मान्यता दिली असून त्यातून ५५ हजारांपेक्षा अधिक तरुणांना रोजगार मिळणार आहे. सरकारी विभागांमध्ये ७५ हजार नोकऱ्या आम्ही उपलब्ध करुन देत आहोत, मात्र खासगी क्षेत्रातही आता या गुंतवणुकीमुळे नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

## विजेचा शॉक बसल्याने तरुणीचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर : विजेचा शॉक बसल्याने २० वर्षाय तरुणी मरण पावली. ही घटना उ. सदर बझार परिसरातील अशोक नगर येथे गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. श्रद्धा बाबासाहेब बनसोडे (वय२०) असे मयत झालेल्या तरुणीचे नाव आहे. आज सकाळी सात वाजेच्या सुमारास ती छतावरील कपडे काढण्यासाठी गेली होती. त्यावेळी तारेचा स्पर्श झाल्याने ती बेशुद्ध पडली. तिला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ती उपचारपूर्वी मयत झाली.मयत श्रद्धा हिच्या पश्चात आई-वडील दोन भाऊ असा परिवार आहे. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.

## धोत्रीत श्री नागनाथ गुरुसिद्धप्पा महाराज पॅनलची प्रचारात आघाडी

### पॅनल प्रमुख शिवानंद चौगुले, शरणप्पा बिराजदार, बनप्पा माळी, सिद्धाराम चौगुले यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते घेत आहेत मेहनत



अक्कलकोट : द. सोलापूर तालुक्यातील धोत्री येथे अतिशय लक्षवेधी ठरत असलेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक प्रचारात श्री नागनाथ गुरुसिद्धप्पा महाराज ग्रामविकास पॅनलने जोरदार आघाडी घेतली आहे.थेट सरपंच पदाच्या उमेदवार सौ. प्रभावती गंगाधर चौगुले यांनी 'डोअर टू डोअर' प्रचारावर भर दिला असून त्यांना मतदारांची चांगलीच साथ मिळत आहे. विकास व परिवर्तन या मुद्दयावर युवा कार्यकर्ते मतदारांच्या घरोघरी जात प्रत्यक्ष भेटींवर भर देत आहेत. दरम्यान, गावातील प्रतिष्ठित ग्रामस्थ प्रचारात सहभागी झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये अधिक उत्साह निर्माण झाला आहे.

यावेळी धोत्रीच्या रखडलेल्या विकासकामांना गती देण्यासाठी थेट सरपंच पदासाठी अधिकृत उमेदवार सौ. प्रभावती गंगाधर चौगुले यांच्यासह पॅनलच्या सर्व उमेदवारांना निवडून द्या असे आवाहन प्रचारावेळी सामाजिक कार्यकर्ते शिवानंद चौगुले यांनी मतदारांना केले. धोत्री ग्रामस्थांच्या आशीर्वादाने ग्रामपंचायतीत सरपंचांसह पॅनलचा विजय निश्चित असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना ते व्यक्त केला.संपूर्ण धोत्री गावाच्या विकासाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून आम्ही निवडणुकीला सामोरे जात आहोत. यासाठी गावाच्या विकासाची धुरा अभ्यासू आणि गोर गरिबांचे विचार करणाऱ्या माणसांकडे द्यायचे आहे. गावासाठी झोकून देणारे आणि विकासाची जाण असणारे कार्यक्षम उमेदवार दिले आहे. त्यांच्या पाठीशी राहून त्यांना गावाची सेवा करायची संधी द्यावी, सामान्य जनतेच्या हितासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील असलेल्या या सर्व उमेदवारांना ग्रामस्थांचा पाठिंबा मिळेल याची आम्हाला खात्री आहे. त्यामुळे सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून द्यावे असे आवाहन यावेळी बनप्पा माळी यांनी केले.चौगुले घराणा सामाजिक क्षेत्रात कार्यरत असल्याने माझा जनसंपर्काचा फायदा गावच्या विकासासाठी होण्यास मी कटिबद्ध आहे. गावातील ज्येष्ठ व युवा कार्यकर्त्यांसह महिला भगिनींची साथ आम्हाला आहे. त्यामुळे छत्री चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करावे व श्री नागनाथ गुरुसिद्धप्पा महाराज ग्रामविकास पॅनलच्या सर्वच्या सर्व ९ ही उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून द्या असे आवाहन सरपंच पदाच्या उमेदवार प्रभावती गंगाधर चौगुले यांनी केले. आम्हाला चारही वॉर्ड मध्ये जनतेचा मोठा पांठिबा मिळत आहे. पंचवार्षिक मध्ये झालेला प्रचंड भ्रष्टाचार व गावातील पारंपारिक दडपशाही संपविण्यासाठी निवडणुकीत तिसरा पर्याय म्हणून जनता आम्हालाच कौल देईल. गावाचा सर्वांगीण विकास व्हावा या हेतुने जनतेच्या आग्रहाखातर ते थेट सरपंचपदी छत्री या निशाणीसह निवडणूक रिंगणात असून जनतेचा प्रचारात आम्हाला मोठा पांठिबा मिळत आहे.आम्ही प्रचारात आघाडी घेतली असून आमच्या सर्व उमेदवारांचा विजय निश्चित आहे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते गंगाधर चौगुले यांनी केले आहे.

## पॉश मशीनवर थंब दोन महिन्यांचे; धान्य वाटप एका महिन्याचे

### रेशन दुकानदारांची बनावीबनवी पुन्हा चालू

सुराज्य/सोलापूर

सोलापूरातील रेशन दुकानातील काळाबाजाराचा डागोंरा हिवाळी अधिवेशनात वाजला आहे. याची उत्तरे देताना प्रशासनाची दमछाक होता असताना शहरातील रेशन दुकानदारांचा नवा प्रताप चव्हाट्यावर आला आहे. केंद्र आणि राज्य शासन दोन्ही योजनेत मोफत धान्य वाटपास मान्यात असताना बनवाबनवी करत पॉश मशिनवर दोन महिन्याचे थंब घेऊन एकाच महिन्याचे धान्य वाटप करत एका महिन्यासह दुसऱ्या योजनेच्या धान्यावर डल्ला मारत काळाबाजार केला जात असल्याचे दिसत आहे.



मोफत धान्य योजनेंतर्गत प्रतिमाणसी एक किलो गहू व चार किलो तांदूळ तसेच राज्य शासनाकडून सवलतीच्या दरातील प्रतिमाणसी दोन किलो गहू व तीन किलो तांदूळ ग्राहकांना मिळणे अपेक्षित आहे. फक्त तांदूळ वाटप केल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. तसेच शहरातील अनेक दुकानदारांनी दोन्हींपैकी एका योजनेचे धान्य वाटप करून दुसऱ्या योजनेतेतील धान्याचा काळा बाजार करत धान्यावर डला मारत अअपेले खिसे भरत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. युक्रेन देशावरील हल्ल्यामुळे भारतातील गहू निर्यात करण्यात आल्यामुळे भारतात गव्हाचा तुटवडा जाणवत आहे. गव्हाच्या तुटवड्यामुळे नागरिकांना मिळणारे गव्हाचे प्रमाण कमी करण्यात आले. याचाच फायदा घेत दुकानदार घेत आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य जनतेची उपासमार होऊ नये याकरिता केंद्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून मोफत तर राज्य शासनाकडून सवलतीच्या दरातील धान्य वाटप केले जात आहे. मात्र ग्राहकांना योजनेचे धान्य बंद झाल्याचे सांगत हा काळ्या बाजाराचा उद्योग चालु आहे. आ. प्रणिती शिंदे यांच्या तक्रारींनंतर पथके नेमून तपासणी केली होती. या तपासणीचा अहवाल जानेवारी मध्ये सादर केला जाणार आहे.

सर्व चार परिमंडलामध्ये अनेक दुकानदारांवर दंडात्मक कारवाई तर परवाने निलंबन होण्याची शक्यता आहे अशी कारवाईची टांगती तलवार असताना शहरातील दुकानदार, व्यापारी आणि परिमंडळ अधिकारी यांचे लागेबांधे च्या माध्यमातून भ्रष्ट्राचाराचे कुराण चालु आहे. याला अंकुश कधी बसणार अशी विचारणा केली जात आहे.

- काळ्या बाजारा संदर्भात हिवाळी अधिवेशनात उपस्थित केलेल्या प्रश्ना संदर्भात सर्व माहिती परिमंडल निहाय सादर केली आहे. थेट वाहतुक प्रणालीच्या माध्यमातून धान्य दुकानात दिले जाते. दुकानदार दोन थम घेऊन एका महिन्याचे धान्य देऊन एका महिन्याचा धान्याचा काळा बाजार करत असल्याचे निकष प्रशासनाने काढला आहे.
- सोलापूर एफडीओ कार्यालयाने आधार लिंक मध्ये राज्यामध्ये अघाडी घेऊन काम पुर्ण केले आहे. सर्व ग्राहकांचे अधार लिंक झाले झाल्याने सोलापूरच्या एफडीओ अधिकाऱ्यांना राज्यशासनाच्या वतीने गौरव केला आहे. मात्र शहरातील दुकानदारांनी काळ्या बाजारासाठी नवी शक्कल लडवल्याने सोलापूर एफडीओ कार्यालयाची मोठी बदनामी होत आहे.

# करमाळ्याची जिज्ञासा

सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात एकेकाळी करमाळा तालुक्याची हुकूमत होती. त्या तालुक्याचे सुपुत्र नामदेवराव जगताप यांचे नाव निघाले की-नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना घाम फुटायचा. ही भीती आदरयुक्त होती. नामदेवरावांची इतकी प्रचंड ताकत होती. पक्षाचा आदेश मानून एखादा हुकूम त्यांनी सोडला की, अख्खा जिल्हा एकत्र यायचा. सांगोला-माढ्याप्रमाणे हाही तालुक्या दुष्काळी होता परंतु, आता तिथे हरितक्रांती घडत आहे.त्या क्रांतीला उजनी धरणातील बॅक वॉटरचे वरदान लाभत आहे.आता तिथला शेतकरी जागृत झाला असून राजकारण सोडत आता शेती व्यवसायाला त्याने वाहून घेतले आहे. आजचा तरूण शेतकरीही नवे नवे प्रयोग करून शेती क्षेत्रात क्रांती घडवत आहेत. याचा सोलापूर जिल्हावासियांना मोठा अभिमान वाटत आहे. केळी उत्पादनात या तालुक्याने लौकिक प्राप्त केला आहे.इथे पिकवलेली पिवळर आणि रूचकर केळी विदेशात गेली. त्यामुळे सांगोल्याच्या डाळिंबाप्रमाणे करमाळयाच्या केळीने सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. आता अजून एक सुवार्ता ऐकून सोलापूरकरांची मान नक्कीच उंचावेल. लाल केळी आणि वेलची केळी या दोन प्रकाराच्या केळी उत्पादनात या तालुक्याने गरूडझेप घेतली आहे. देशातील तामिळनाडू आणि कर्नाटक या दोन राज्यांची या प्रकारातील केळी उत्पादनात मक्तेदारी होती. आता करमाळयातील एका तरुण इंजिनियरने या दोन्ही प्रकारच्या केळींचे यशस्वी उत्पादन घेत देशभरातील व्यापाऱ्यांना आपल्या बांधावर येण्यास भाग पाडले आहे. केळींचे उत्पादन सर्रास सर्वत्र घेतले जाते उत्पादन घेतले मात्र, यातही रेड बनाना म्हणजेच लाल केळी आणि वेलची केळी उत्पादनात वर्चस्व निर्माण केले आहे. लाल रंगाची केळी ही आयुर्वेदात अतिशय औषधी आणि गुणकारी म्हणून ओळखली जाते. याचमुळे सर्व व्हीव्हीआयपी आणि उच्चभ्रू वर्गात या केळींना फार मोठी मागणी आहे. आपल्या शेतातील नेहमीची केळी विक्रीला नेल्यावर अभिजीत पाटील या तरुणाला तिथे लाल केळी आणि इलायची केळी पाहण्यात आली. त्यांचा दर ऐकून अभिजीतची जिज्ञासा जागी झाली आणि त्याने याबाबत माहिती घेण्यास सुरुवात केली. मोठमोठ्या शहरातील



फाईव्ह आणि सेव्हन स्टार हॉटेल्स, रिलायन्स, बिग बास्केट, टाटा यासारख्या मोठ्या मॉलमध्ये या केळींची १२० रुपये किलो दराने विक्री होत असल्याचे त्याला समजले. मात्र, या प्रकारची केळी फक्त तामिळनाडू आणि कर्नाटकमधील काही भागातच पिकतात, असे समजल्यावर अभिजीतने ती आपल्या करमाळा तालुक्यातील वाशिंबे इथल्या आपल्या रानात लावण्याचा निर्धार केला. उजनी जलाशयाच्या काठावर अभिजीत पाटील याची शेती असून पूर्वापार इथे ऊसाचे पीक घेतले जात होते. स्थानिक राजकारणामुळे ऊस गाळपाला अडचण येऊ लागल्याने अभिजितच्या वडिलांनी २००५मध्ये पहिल्यांदा या भागात नेहमीच्या केळींची लागवड केली. पुढे या केळींचे कधी दर २० रुपये तर कधी थेट २ रुपये असे बदलत असल्याने कधी फायदा तर कधी तोटा होऊ लागला होता. यानंतर अभिजीतने पहिल्यांदा २०१५ साली वेलची केळी लावण्याचा निर्णय घेतला आणि त्याने ७ एकरवर लागवड केली. वेलची केळीमध्ये अनेक प्रथिने असून याचा फायदा अनेक विकारांवर होत असल्याचे मानतात. हिरवी दिसणारी आणि केवळ २ ते ३ इंच लांबी आणि आकाराने गोलसर असणाऱ्या वेलची केळींचा स्वाद अगदी पेढ्याप्रमाणे असतो. गीर गायींचे शेण, गोमूत्र आणि ऊसाच्या मळींची स्लरी देत त्याने याची जोपासना केली. दहाव्या महिन्यात अभिजीतला एकरी १२ ते १५ टन इलायची केळींचे ५० रुपये किलोप्रमाणे लाखोंचे उत्पन्न मिळाले. यानंतर अभिजीतने ही वेलची केळी ३० एकरात केली आणि दर दहा महिन्यांनी दीड कोटींपेक्षा अधिक उत्पन्न मिळू लागले. यानंतर २०१९ मध्ये अभिजीतने शेतात ३ एकरावर पहिल्यांदाच लाल केळींची लागवड केली. या लाल केळयांचे वैशिष्ट्य म्हणजे यात पोटॅशियम मोठ्या प्रमाणात तर सोडियम कमी प्रमाणात असल्याने हे ब्लड प्रेशरच्या रुग्णांसाठी अतिशय फायदेशीर मानले जाते. रोज दोन लाल केळी खाल्ल्याने कॅन्सर, हृदय विकार, मधुमेह, डोळयांचे विकार हे आजार दूर ठेवण्यासाठी अतिशय फायदेशीर असल्याचे मानले जाते. याशिवाय पचनसंस्था अत्यंत परिणामकारक चालण्याचे कामही या लाल केळयांमुळे होते. रासायनिक खते आणि औषधांना फाटा देत संपूर्ण सेंद्रिय पद्धतीने जोपासना केल्याने १४ महिन्यात एकरी १८ ते २० टन एवढा माल मिळाला. विशेष म्हणजे ही केळी पाहण्यासाठी सध्या जळगाव, नाशिक, औरंगाबादसह राज्यातील विविध भागातून शेतकरी येत असून जवळपास ७० लाख बेण्यांची विक्री झाल्याचे बाळासाहेब पाटील सांगतात. हा आदर्श आजच्या तरूण शेतकऱ्यांनी घेतला पाहिजे.

## सामाजिक

# गरज शाश्वत विकासाची

**मानवाचे कष्ट कमी करण्यासाठी, कमी त्रास होण्यासाठी निर्माण केल्या जाणाऱ्या सुविधांचा विकास म्हणजे शाश्वत विकास, ही संकल्पना बहुतांश लोकांच्या मनात आहे. अशा विकासात निसर्गाचे होणारे नुकसान, त्याचा पुढील पिढीवर होणारा परिणाम याचा कोणी विचार करत नाही. २०२२ हे साल युनेस्कोने 'शाश्वत विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान' या संकल्पनेवर आधारीत उपक्रमांचे आयोजन करून साजरे करण्याचे आवाहन केले. निसर्गातील साधनसंपत्ती सर्व जीवांसाठी आहे, याचा विचार करून त्यांचा वापर करण्याची गरज आहे.**

कोरोनाचे संकट हे पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून उपकारक म्हणायला हवे. या संकटकाळात लॉकडाऊन झाल्याने आपण निसर्गाची कशी हानी करत आहोत, हे किमान जाणवले. तसेच आज घडणाऱ्या अनेक गोष्टींमागे आपले निसर्गाला हानी पोहोचवणारे वर्तन असल्याचेही सिद्ध झाले. २०२० सालच्या मार्चमध्ये उत्तर ध्रुवावरील ओझोन थराला दहा हजार चौरस किलोमीटरचे छिद्र पडले होते. उत्तर ध्रुवावर अशाप्रकारे छिद्र पडण्याची पहिलीच घटना होती. हे छिद्र असेच राहिले असते तर सौरप्रारणातील अतिनील किरणे पृथ्वीवर आली असती. उत्तर ध्रुव आणि इतर ठिकाणचाही बर्फ वितळला असता. पृथ्वीवर अभूतपूर्व जलसंकट आले असते. मात्र, जगभरातील सर्व प्रदूषण करणाऱ्या यंत्रणा लॉकडाऊनमुळे बंद होत्या. प्रदूषके वातावरणात न मिसळल्याने, हवेतील ओझोन थराला पडलेले छिद्र बुजले. मात्र, सर्वकाही पूर्वीसारखे सुरू असते, लॉकडाऊन नसते, तर हे छिद्र बुजले नसते. दुसरीकडे अरबी समुद्रामध्ये वादळे कधीच येऊ शकत नाही, असे सांगणारे वैज्ञानिकही अरबी समुद्रात सतरा महिन्यात तीन वादळे आली.

मागील वर्षी भारतासह अनेक देशांमध्ये पुरांने थैमान घातले. जर्मनी, भारत आणि चीनमध्ये पुराने हाहाकार माजवला. चीनच्या पोलादी भिंतीतून चूकूनच बातम्या बाहेर आल्या. चीनमधील पुरात सहा हजारपेक्षा जास्त कुटुंबांचे स्थलांतर करावे लागल्याची बातमी आली. लाखो कुटुंबांच्या, लाखो हेक्टर जमिनीवर पुराचे पाणी पसरले होते. भारतात जुलैमध्ये मोठा पाऊस झाला. पश्चिम महाराष्ट्राला सर्वप्रथम पुराने वेढले. त्यानंतर उत्तर भारतात पुराने कहर केला. महाराष्ट्रातील पुराचा सर्वाधिक फटका कोकणासह कोल्हापूर, सातारा आणि सांगली जिल्ह्यांना बसला. कोकणातील चिपळूण शहर पुरामध्ये पूर्ण बुडाले. कोल्हापूर, सातारा आणि सांगली जिल्ह्यातील एकाही धरणातून पाणी न सोडताही पूर आला होता. सह्याद्रींच्या पर्वतरांगात अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या. भक्कमपणाचा दाखला म्हणून सह्याद्रींचा दाखला देण्यात येत असे. त्याच सह्याद्रींच्या कडा अनेक ठिकाणी ढासळल्या. दरड कोसळल्याने शंभरपेक्षा जास्त लोकांचे जीव गेले. पन्हाळ्याची तटबंदी कोसळली. विशाळगडावरही भेगा पडल्या. पूर्वी माळीण गावातही दरड कोसळून गावाचे अस्तित्वच पुसले गेले.

२०२२ मध्ये उलट घडले आहे. पश्चीम महाराष्ट्रात पाऊस समाधानकारक असला तरी पूराचे थैमान नाही. चीनमध्ये मात्र, अर्थव्यवस्थेला धक्का पोहोचवणारा दुष्काळ पडला आहे. पाकिस्तानमध्येही पुराने थैमान घातले आहे. महाराष्ट्र आणि भारतातही यावर्षी मोठ्या प्रमाणात दरडी कोसळल्या. या सर्व गोष्टीमागे मानवाने निसर्गात केलेला अविचारी हस्तक्षेप हे कारण आहे. या सर्वांचे खापर निसर्गाच्या लहरीपणावर टाकतो. असा निसर्ग पूर्वी वागलाच नाही असे नाही. मात्र, पूर्वी अशी अपरिमित हानी झाली नव्हती.

पश्चिम महाराष्ट्रात १९८९ साली आणि नंतर २००५ साली पूर आला होता. त्यानंतर २०१९ सालापाठोपाठ २०२१ साली पूर आला. या पाठोपाठ आलेल्या पुरामुळे आणि वाढत्या नुकसानीमुळे पूर आणि नैसर्गिक आपत्तींचा नव्याने विचार करण्यात येऊ लागला. जुलै २०२१ मध्ये राष्ट्रसंघाच्या 'इंटरगव्हर्मेंटल पॅनेल फॉर क्लायमेट चेंज' या संस्थेने आपला सहावा अहवाल सादर केला. त्यानुसार हिंद महासागरातील समुद्राचे तापमान वेगाने वाढत आहे. यामुळे अरबी समुद्रात वारंवार वादळे येणार, ढगफुटी किंवा कमी वेळात अतिवृष्टी आणि पूर परिस्थिती वारंवार उद्भवणार, तसेच दक्षिण भारतात पावसाचे प्रमाण ४० टक्के वाढण्याचे संकेत दिले आहेत. तसेच यावर्षी घडत आहे. महाराष्ट्रात लातूर, कोल्हापूर, सातारा, पुणे येथे ढगफुटीच्या घटना घडल्या आहेत. काही भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याचे अनुमानही नमूद आहे. तापमानवाढीमुळे दक्षिण मुंबईचा बहुतांश भाग, कोकण किनारपट्टीवरील अनेक गावासह पाण्याखाली जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यावर्षीचा चीनमधील दुष्काळही या अहवालातील नमूद अनुमानानुसार आहे.



'मानवाकडून होणारा अविचारी पद्धतीने विकास या बदलत्या निसर्ग चक्राला कारणीभूत आहे. औद्योगिक प्रगतीची सुरुवात झाल्यापासून आजतागायत ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर म्हणजे विकास', असे सूत्र जगाने मान्य केले. ऊर्जा मिळवण्यासाठी खनिज तेले आणि कोळशाचा प्रचंड वापर करण्यात येऊ लागला. त्यातून मोठ्या प्रमाणात प्रदूषणकारी घटक वातावरणात मिसळू लागले. या प्रदूषकांची सौर ऊर्जा शोषण करण्याची क्षमता मोठी असते. परिणामी जागतिक पातळीवर तापमान वाढ होते. 'अतिरेकी ऊर्जेच्या वापरातून होणारे प्रदूषण, त्यामुळे वाढणारे तापमान आणि त्यांचा वातावरणावर होणाऱ्या परिणामाची जाणीव संशोधकांना झाली. १९६९ साली मायकेल ओपेनहायमर या संशोधकाने सर्वप्रथम मानवाच्या अविचारी विकासाने पृथ्वीवरील निसर्गाचे नुकसान होते', हे सांगितले. त्यानंतर अनेक संशोधकांनी या विषयावर संशोधन करून ओपेनहायमर यांच्या निष्कर्षांस पुष्टी दिली. आजही असे संशोधन प्रसिद्ध होत आहे. 'आयपीसीसी'चा अहवाल त्याचाच एक भाग.

ओपेनहायमर यांच्या इशाऱ्यानंतर दहा वर्षांनी १९७९ मध्ये जागतिक तापमान वाढीसंदर्भात अधिकृत चर्चा सुरू झाली. जिनेव्हा येथे पहिली जागतिक परिषद झाली. त्यानंतर १९९०, २००९ मध्येही अशा परिषदा झाल्या. या सर्व परिषदांमध्ये सर्वांनीच जागतिक तापमान वाढ थांबली पाहिजे, प्रदूषण कमी झाले पाहिजे, खनिज तेलाचा वापर नियंत्रित झाला पाहिजे, असे मान्य केले. मात्र अंमलबजावणीची वेळ आल्यानंतर, प्रदूषण कमी करण्याची जबाबदारी दुसऱ्याची', अशी भूमिका घेत आले. अमेरिकेसारख्या प्रगत देशांनी, विकसनशील देशांनी खनिज तेल आणि दगडी कोळशाचा वापर कमी करावा, असे सुचवले. विकसनशील देशांनी विकसित देशच याला जबाबदार आहेत, त्यांनीच याची अंमलबजावणी करावी', असा सूर आळवला. प्रश्न तसाच राहिला. उलट खनिज तेलाचा वापर दिवसेंदिवस वाढला. जागतिक तापमानवाढ होतच राहिली. त्याचेच परिणाम वसुंधरा भोगत असल्याचे, संशोधक सांगतात. मात्र, ऐकणार कोण?' हा प्रश्न आहे.

जागतिक तापमान वाढ हा सर्वात मोठा धोका. खनिज तेलाचा अमर्याद वापर थांबला पाहिजे, हे सर्वांना मान्य आहे. मात्र, तसे होत नाही. तथापि, जागतिक तापमान वाढीचे आणि निसर्ग चक्रावर अनिष्ट परिणाम होण्याचे, हे एकमेव कारण नाही. अविचाराने होत असलेला सर्वच क्षेत्रांतील विकास सर्वात मोठा धोका बनला आहे. त्या दृष्टीने नैसर्गिक संकटांकडे पाहायला हवे. कोल्हापूर, सांगली भागांत वारंवार येणारे पूर, त्यांची वाढती तीव्रता ही प्रामुख्याने महामार्गाचे देणगी आहे. पंचगंगा नदीवरून महामार्ग जात असताना केवळ पंचगंगा नदीवर पूल बांधला गेला आहे. पूर आला की पाणी पात्राबाहेर पडते. हे पाणी जाण्यासाठी पात्राच्या दोन्ही बाजूला मार्ग नाही, तेथे पंधरा ते वीस फूट उंचीचा भराव आहे. इतर ठिकाणचे डोंगर पोखरून हे भराव घातले आहेत. त्यामुळे पूरस्थितीत नदीचे पात्र आणि पूल एक कालवा बनतो. तर भराव धरणाचा बांध. पात्राबाहेरील पाणी भरावामुळे अडते. पाण्याचा फुगवटा वाढतो. शहर पुराखाली जाते. अतिवृष्टी तर जागतिक तापमानवाढीची देणगी आहे. काही तासांत, एक दोन दिवसांत अतिवृष्टी होणे हा तापमान वाढीचा परिणाम आहे. जागतिक तापमान वाढीचा प्रश्न चर्चेत येण्यापूर्वीही अतिवृष्टी होत असे. मात्र, आता त्याची वारंवारिता वाढली आहे. ठिकाणांची घनताही वाढली आहे. अतिपाऊस पडला की पूर येणे स्वाभाविक आहे. मात्र, हा पूर पाऊस थांबताच न ओसरणे, हे अनैसर्गिक आहे. पूर न ओसरण्यामागे महामार्गाचे अविचारी बांधकाम हे महत्त्वाचे कारण असल्याचे आज तज्ज्ञ सांगत आहेत. महामार्गांचे बांधकाम नव्याने करण्याची मागणी जोर धरत आहे.

**(पूर्वार्ध) - विलास शिंदे.**

## टुडेज ब्लॉग

# व्रतस्थ शक्ती

**व्रतात शक्ती असते! ती अपार असते. ती दुर्बळ, असहाय्य लोकांनाही, कमालीची उपयुक्त ठरते. ह्या गोष्टी, मला पुराणातील वानगी वाटत असत. कसलं व्रत आणि काय ती त्याची शक्ती! अशा पूर्णतः नास्तिक भावनेने मी संपूर्णतः पछाडलेलो होतो. मग आज असा अचानकच काय फरक पडला? आज मला साक्षात्कार झाला. ती शक्ती प्रत्यक्षात दिसून आली. प्रत्येक माणसास ती प्रत्यही उजागर करता येते, हे उमजून आले. कालांतरापासूनचा माझा भ्रम निरस्त झाला.**

ह्यापूर्वी मनुष्य अन्नावाचून अमूक एक काळपर्यंत जिवंत राहू शकतो, पाण्यावाचून तमूक काळपर्यंत जिवंत राहू शकतो, हवेवाचूनही काही काळ गुदमरत राहू शकतो आणि मुंडीविहीन धडाने दोन्हीही हातात पट्टे घेऊन शत्रूचे शिरकाणही करू शकतो (आठवा बाजीप्रभू देशपांडेंची अमर सत्यकथा!) एवढीच काय ती माहिती, मनावर कोरली गेलेली होती. प्रत्यक्षात कुणी असा जगतांना पाहण्याचे भाग्य मला लाभलेले नव्हते.

गणेश चतुर्थी, ऋषीपंचमी, महालक्ष्म्यांच्या दिवसांत अनेक स्त्रिया परंपरेने उपास करत आलेल्या आहेत. माझ्या लहानपणापासूनच, आमच्या घरी मात्र अशा व्रतांकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नव्हते. म्हणून मला त्यातल्या व्रत संकल्पनेची फारशी सखोल माहिती नव्हती. व्रताबाबत मला फारसे कौतुकही नव्हते.

लहानपणी कहाणीसंग्रहातील व्रतांच्या कथा मात्र मी पूर्ण तपशीलाने आणि अत्यंत उत्सुकतेने वाचलेल्या मला आठवतात. उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही अशी शपथ घेऊन लोक जे व्रत पत्करत असत, ते ईप्सित आराध्य दैवत प्रसन्न होऊन समोर प्रकट होईपर्यंत अत्यंत कर्मठपणे पाळत असत. असेच त्यात ठसवलेले असे. माझ्या पूर्ण बालवयात, मी मात्र कुणा दैवतास साक्षात प्रकटतांना पाहिलेले नसल्याने, कहाणीसंग्रहातील कथा मला भाकड वाटू लागल्या ह्यात नवल ते काय?

अमेरिकेत गेलेले भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मॅडिसन-स्क्वेअर-गार्डन प्रेक्षागृहात, अमेरिकेत स्थायिक झालेल्या भारतीयांना संबोधित करत होते. भाषण जोशपूर्ण झाले. तिथल्या लोकांच्या प्रश्नांना उत्तरे देणारे काही निर्णयही, त्यांनी तिथे जाहीर केले. सगळे प्रेक्षक खूश होते. अखेरीस भाषण संपता संपता त्यांनी सगळ्या प्रेक्षकांकडून 'भारत माता की जय' अशी घोषणा करवून घेतली. त्यावर ते म्हणाले की, 'आणखी जरा जोरात म्हणा, भारत माता की जय.' कारण माझे जरी उपवास सुरू असले, तरी तुमचे नाहीत. मग पुन्हा त्रिवार घोषणा झाल्या, 'भारत माता की जय'. अतिशय जोशात. मला मग समजले की, आपले पंतप्रधान गेल्या पस्तीस वर्षांपासून, दरच वर्षी नवरात्रांत उपवास करत आहेत. मी आश्चर्यात बुडून गेलो.



गरीब, दुबळ्या, वंचितांना, जेव्हा उपजीविकेची साधने उपलब्ध नसतील; तेव्हाही त्यांना आपल्या पंतप्रधानांच्या व्रताची हकिकत समजल्यावर, आणि त्यांच्या कर्मठतेने केलेल्या व्रताचरणाची माहिती समजल्यावर; प्राप्त परिस्थितीशी झुंजण्याकरता त्यांच्यात हजार हत्तींचे बळ निर्माण होईल. नरेंद्र मोदींच्याच म्हणण्याप्रमाणे, जर सव्वाशे कोटी भारतीयांनी, राष्ट्रसेवेच्या अशाच शक्तीशाली व्रताचा स्वीकार केला तर, अशक्यप्राय उद्दिष्टेही आपण सहजच गाठू शकू. निदान मला तरी आता अशा व्रतस्थ शक्तीची ओळख पटली आहे. स्वतःमध्ये ती उजागर करण्याचा मी भरकस प्रयत्न करेन. मान्यवर, आपण काय म्हणता?

**- नरेंद्र गोळे.**

## जन्म हा अखेरचा

# धर्माचारस्थल - ४



कारण इतर दानी माणसे आपल्या हाताने थोडे दान करतात, परंतु कृपण मात्र हातांचा उपयोग न करता मृत्यूनंतर आपले सर्वस्वच इतरांना देऊन जातो. एवढा तो दानशूर असतो. या सुभाषितात अप्रत्यक्षरित्या लोभी माणसाची टवाळी केली आहे. लोभामुळेच मनुष्याकडून पापे घडतात. म्हणून एका हिंदी कवीने, **'लोभ पाप का बाप बखाना । दान धर्म का मूल ।'** असे म्हटले आहे. एखाद्या वृक्षाची मुळे तोडून टाकली तर तो जीवंत राहणार नाही. त्याप्रमाणे दानधर्माचा त्याग केला तर आपले धर्मजीवन सुकून जाईल. तुम्ही जेंव्हा दान करता तेंव्हा ते व्यर्थ जात नाही. एखादे बीज जर तुम्ही भूमीला दान केले तर भूमी सहस्त्रपटीने त्याची परतफेड करते. तसे तुम्ही केलेले दान वृद्धिंगत होऊन तुम्हांलाच परत मिळते.

उपनिषदात एक सुंदर कथा आहे. एका माणसाने सणानिमित्त देव-दानवांना भोजनाचे आमंत्रण दिले. देवांना अग्रमान दिल्यामुळे दानवांना राग आला. ते म्हणाले, 'आम्ही देवांपेक्षा ज्येष्ठ आहेत, म्हणून आम्हांला भोजनाला आधी बसवा.' त्या माणसाने ते मान्य केले. परंतु एक अट घातली. तो म्हणाला, 'भोजनात मी तुम्हांला अग्रमान देईन. परंतु, त्याआधी तुमच्या हातांना मी काठी बांधीन. ती बांधल्यावरच तुम्ही जेवावे अशी अट आहे.' **(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

# महिला उद्योजकांना भक्कम आर्थिक बळ

## जनमानस

देशातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी गेल्या आर्थिक वर्षात लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना केलेल्या एकूण कर्ज वितरणापैकी ३ लाख ५ हजार कोटी रुपयांचे विक्रमी कर्ज महिला उद्योजकांना वितरित झाल्याची माहिती रिझर्व्ह बँकेने दिली आहे. हीच आकडेवारी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. कराड यांनी लोकसभेत लेखी उत्तराद्वारे दिली आहे. कित्येक महिला लघु उद्योगाच्या अंतर्गत पीठ, मसाले यांची चक्की चालवणे, खानावळ चालवणे, मसाले - लोणचे - पापड बनवून देणे, लाडू - बिस्किटे आदी गोड पदार्थांची मागणी घेणे आणि पुरवठा करणे, गारमेंट चालवणे आदी उद्योग मन लावून करताना दिसतात. त्यात त्या इतक्या गुंग होतात की, करत असलेल्या कामात अधिक अचूकता कशी आणता येईल आणि ग्राहकाचे समाधान कसे होईल? हाच ध्यास असतो. उद्योगधंदा कसा करावा, व्यवहार कसा सांभाळावा हे महिलांकडूनच शिकता येईल. स्वतःचा उद्योग चालू करून अनेकांना नोकरी मिळवून देणारे होणे ही खूप मोठी गोष्ट आहे. नोकरी नाही म्हणून खेद करत न बसता अनेकांच्या कुटुंबासाठी आसरा होणे वाखाणण्याजोगे आहे.

आज आरंभ लघु उद्योगापासून असला तरी त्याची वाटचाल उद्या मध्यम ते मोठ्या उद्योगापर्यंत होऊ शकते. तसे करण्याची क्षमता महिलांत नक्कीच आहे. 'तुला व्यवहार ज्ञान नाही. तू गप्प बस', असे म्हणत महिलांना शांत केले जाते. पण महिलांचे व्यवहार ज्ञान किती चांगले आहे? हे त्यांना मिळालेल्या कर्जाच्या आकड्यांवरून कळते. त्यामुळे त्यांना पुढे येण्यासाठी कुटुंबातील सदस्यांनी भक्कम पाठिंबा दिला पाहिजे. हे त्यांचे कर्तव्य आहे. कुटुंबासाठी स्त्री अनेक जबाबदाऱ्या पार पाडते. तरीही समाजात मुलगी नको असा नकारात्मक विचार करणारे नतद्रस्ट आहेत. या संकुचित विचारसरणीच्या लोकांना महिला उद्योगजकांची झेप म्हणजे सणसणीत चपराक आहे. उद्या याच यशस्वी महिलांकडे बघून कित्येक महिला त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेवण्यासाठी सिद्ध होतील आणि कुटुंबासह देशाच्या प्रगतीतही मोलाचे योगदान देतील. तो दिवस दूर नाही. कारण बडे उद्योजक सांगत आहेत की, 'देशांतर्गत विविध क्षेत्रातील वस्तूंची मागणी प्रचंड वाढत आहे. यास्तव येथे परकीय गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत आहेत. त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था बळकट होत आहे.' त्यासाठी अधिकाधिक महिलांनी उद्योगाकडून वळून स्वतःचे सर्वोत्तम प्रयत्न केले पाहिजे. **- जयेश राणे, मुंबई.**

# साठे विकास महामंडळाची थेट कर्ज योजना

**मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील दारिद्र्यरेषेखालील गरजू घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी, तसेच त्यांना स्वयंरोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत थेट कर्ज योजना राबविली जाते. या योजनेंतर्गत कर्जमर्यादा रक्कम रुपये २५ हजार वरून एक लाख रूपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. या योजनेसाठी सध्या कर्ज मागणी अर्ज वितरण सुरू असून, २० डिसेंबरपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक टी. आर. शिंदे यांच्याकडून या योजनेची जाणून घेतलेली ही अधिक माहिती...**

**कर्जविषयक माहिती :** कर्जामध्ये महामंडळाचा हिस्सा रु. ८५ हजार (८५७), अनुदान रक्कम रु. १० हजार (१०७), अर्जदाराचा सहभाग रु.५ हजार (५७) असे एकूण १ लाख रुपये कर्ज (१००७) देण्यात येते. तीन वर्षे (३६ महिने) कालावधीसाठी दर साल दर शेकडा ४ टक्के व्याजदराप्रमाणे कर्ज दिले जाते. या योजनेसाठी सोलापूर जिल्ह्यासाठी एकूण ६५ लाभार्थींचे रक्कम रु. ६५ लाखांचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे.

**उद्दिष्ट वितरण :** या योजनेत साधारणपणे पुरुष ५० टक्के व महिला ५० टक्के आरक्षण राहील. ग्रामीण भागासाठी प्राधान्य राहील. राज्यस्तरावरील क्रीडा पुरस्कारप्राप्त व्यक्तींना प्राधान्य राहील. सैन्य दलातील वीरगती प्राप्त वारसाच्या घरातील एका सदस्यास प्राधान्याने लाभ देण्यात येईल.

**पात्रता व निकष :** अर्जदार मांग, मातंग, मिनी-मादीग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गोराडी, मादगी व मादिगा जातीतील असावा. अर्जदार महाराष्ट्रातील रहिवासी असावा. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे असावे. अर्जदाराने यापूर्वी महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न तीन लाखापेक्षा जास्त नसावे. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराने अर्जासोबत आधारकार्ड जोडलेल्या बँक खात्याचा तपशील सादर करावा. अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल त्या व्यवसायाचे ज्ञान व अनुभव/प्रशिक्षित असावा. अर्जदाराचा उळलळश्र ऊीशवळीं डलेीश ५०० च्या वर असावा.

**आवश्यक कागदपत्रे :** सक्षम अधिकारी यांच्याकडून घेतलेला जातीचा दाखला, अर्जदाराच्या कुटुंबाचा तीन लाख रुपयांपर्यंतचा उत्पन्नाचा दाखला, नुकतेच काढलेले दोन फोटो, अर्जदाराचा शैक्षणिक पुरावा/शाळेचा दाखला, आधार कार्ड, रेशनकार्ड, पॅनकार्ड, ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा आहे, त्या जागा उपलब्धतेचा पुरावा (भाडे पावती, करारपत्र), व्यवसायासंबंधी तांत्रिक प्रमाणपत्र व अनुभव दाखला, यापूर्वी शासकीय कर्ज योजनेचा व अनुदानाचा लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र, शॉप ॲक्ट/ग्रामसेवकाचे व्यवसाय करण्यास ना हरकत दाखला. व्यवसाया संदर्भात साहित्य/माल खरेदीचे दरपत्रक/कोटेशन, अर्जदारास महामंडळाच्या प्रचलित नियमानुसार व्यवसायास अनुरूप असलेली आवश्यक ती कागदपत्रे प्रमाणपत्रे/करारपत्रे कर्ज मागणी अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**कर्ज प्रक्रिया :** कर्ज प्रकरण कार्यालयाकडे प्राप्त झाल्यास, परिपूर्ण असे कर्ज प्रस्ताव लाभार्थींच्या निवडीसाठी, प्रथम लाभार्थी निवड समितीच्या मान्यतेसाठी व मंजुरीस्तव सादर करण्यात येतील. प्राप्त झालेल्या कर्ज प्रस्तावाची संख्या उद्दिष्टांपेक्षा जास्त असल्यास, लाभार्थींची निवड चिठ्ठीद्वारे (लॉटरी पद्धतीने) करण्यात येईल. अर्जदाराच्या Cibil Credit Score ५०० च्या वर आहे किंवा कसे याबाबत कर्ज मंजूर झाल्यानंतर अहवाल सादर करावा लागेल. कर्जमंजुरीची प्रक्रिया झाल्यानंतर कर्ज प्रकरणी कर्ज वसुलीसाठी दोन सक्षम जामीनदार घेण्यात येतील. सहभाग रकमेपोटी ५ हजार रुपयांचा धनाकर्ष महामंडळाच्या नावे जमा करावा लागेल. कर्ज वितरणापूर्वी लाभार्थीकडून वसुलीपोटी २० उत्तर दिनांकित धनादेश घेण्यात येतील. कर्जदाराच्या वारसाचे १०० रुपयांच्या बाँडवर वारसदार म्हणून प्रतिज्ञापत्र, इतर वैधानिक दस्ताऐवजांची पूर्तता करणे बंधनकारक आहे. ३ वर्ष (३६ महिने) कालावधीसाठी दर साल दर शेकडा ४ टक्के व्याजदराने कर्ज रक्कम वितरित केली जाईल.

**- संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# दुहेरी जलवाहिनीच्या कामात आता ‘पोचमपाड’ने दाखवला इंटरेस्ट

## • कंपनीने काम करण्यासंदर्भात दिला नवा प्रस्ताव

✔ सुराज्य/सोलापूर

स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या अंतर्गत महत्त्वकांक्षी प्रकल्प मानला जाणाऱ्या उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनीचा मक्ता यापूर्वीच रद्द करण्यात आलेल्या हैदराबादच्या पोचमपाड कंपनीने पुन्हा काम करण्यासंदर्भात स्मार्ट सिटी कार्पोरेशनकडे नवा प्रस्ताव दिला आहे.

सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनची बैठक गुरूवारी चेअरमन असीम गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्या बैठकीत कंपनीने पुन्हा प्रस्ताव दिला आहे. यावेळी महापालिका आयुक्त तथा स्मार्ट सिटीचे सीईओ शितल तेली - उगले, नगर अभियंता संदीप कारंजे उपस्थित होते. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत शहरात विकासकामे हाती घेताना त्यात उजनी-सोलापूर समांतर जलवाहिनी योजना प्राधान्यक्रमाने हाती घेण्यात आली होती. स्मार्ट सिटी



डेव्हलपमेंट कार्पोरेशनचे २०० कोटी आणि एनटीपीसीने दिलेले २५० कोटी असे मिळून ४५० कोटी खर्चाची ही ११० किलोमीटर लांबीची समांतर जलवाहिनी योजना मंजूर झाली. ही योजना मार्गी लावण्याचा मक्ता हैदराबादच्या पोचमपाड कन्ट्रक्शन कंपनीला देण्यात आला होता. दरम्यान, कोरोना महामारीमुळे लॉकडाऊन असल्याने काम प्रलंबित राहिले. विलंब झाल्याने स्टील व इतर साहित्याचे दर वाढले. दरम्यानच्या काळात विलंबामुळे व इतर कारणास्तव हैदराबादच्या या कंपनीस दंड ही करण्यात आला होता. तसेच टर्मिनेट करण्याबरोबरच त्यांची डिपॉझिटही स्थगित ठेवण्यात आली. त्यानंतर त्यांचा मक्ता रद्द करण्यात आला.

त्यानंतर चालू वर्षी कोल्हापूरच्या लक्ष्मी कंपनीस ६३९ कोटी रुपयांमध्ये पुन्हा नव्याने या दुहेरी जलवाहिनीच्या कामाचा मक्ता देण्यात आला आहे. आता नियमानुसार आहे त्या दरामध्ये दुहेरी जलवाहिनीचे काम करण्यासंदर्भात हैदराबादच्या पोचमपाड कंपनीने स्मार्ट सिटी कडे नवा प्रस्ताव दाखल केला आहे. आता स्मार्टसिटी याबाबत काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.

### कायदेशीर मार्गदर्शन घेऊन निर्णय घेऊ : गुप्ता

दोन मक्तेदाराकडून काम करता येऊ शकते का ? यापूर्वीच टर्मिनेट करून या कामाचा मक्ता रद्द केलेल्या पोचमपाड कंपनीने नवा प्रस्ताव दाखल केला आहे. या प्रकरणी कायदेशीर मार्गदर्शन घेण्यात येणार आहे. त्यानंतरच ७ जानेवारी रोजी होणाऱ्या बैठकीत यासंदर्भात पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याचेही चेअरमन असीम गुप्ता यांनी सांगितले.

### मार्च २४ पर्यंत दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण होणार

उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम महत्त्वाचे आहे. सोलापूर शहराच्या पाणीपुरवठ्याचा हा अत्यावश्यक विषय असल्याने नियोजित वेळेत हे काम पूर्ण करण्याकडे प्राधान्याने लक्ष देण्यात येत आहे. क्षमता आणि टेक्निकल डिझाईनकडे अधिक लक्ष दिले जात आहे. पावसाळ्याच्या आत अधिक क्षमतेने कसं काम करता येईल, याचे नियोजन सुरू आहे. अधिक जलद गतीने काम करून घेण्यात येईल. या येत्या मार्च २०२४ पर्यंत दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण होईल, असेही चेअरमन असे गुप्ता यांनी यावेळी सांगितले.



## अकलूजमध्ये बंदला प्रतिसाद

✔ **अकलूज** : अकलूज मध्ये महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महामानवाबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ बंद पाळून व आक्रोश मोर्चा काढून निषेध नोंदविण्यात आला. राज्याचे राज्यपाल भगतसिंह कोशारी व उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी थोर महापुरुषानंबद्दल केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ बंद पाळण्यात आला यावेळी आक्रोश मोर्चाही काढण्यात आला या मोर्चाच्या माध्यमातून उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती ट्रॉसिटी क्टनुसार कायदेशीर कारवाई व्हावी, राज्यपाल कोशारी यांना त्वरित पदमुक्त करावे व मनोज गरबडे व त्यांच्या दोन साथीदारावरील गुन्हा मागे घ्यावा या मागण्या ही यावेळी करण्यात आल्या. या मोर्चामध्ये विविध पक्ष संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.उपविभागीय अधिकारी माळशिरस उपविभाग अकलूज यांना याप्रसंगी निवेदन देण्यात आले.





## पालिकेच्यावतीने गोवर लसीकरणाचा शुभारंभ

✔ **सोलापूर** : शासनाच्या मार्गदर्शनानुसार सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने विशेष गोवर लसीकरण मोहीम हाती घेण्यात आले असून गुरूवारी दाराशा नागरी आरोग्य केंद्र येथे या मोहिमेचे शुभारंभ महापालिकेचे आयुक्त शितल तेली-उगले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आरोग्य अधिकारी डॉ.बसवराज लोहारे, डॉ. अरुंधती हराळकर, डॉ.मंजिरी कुलकर्णी, डॉ.आशुतोष बोराडे, शहर लेखा व्यवस्थापक सिद्धेश्वर बोरगे आदी मान्यवर उपस्थित होते. ही मोहीम पहिली फेरी दिनांक १५ डिसेंबर ते २५ डिसेंबर २०२२ तसेच दुसरी फेरी दिनांक १५ जानेवारी ते २५ जानेवारी २०२३ या दरम्यान घेण्यात येणार आहे. आजारांपासून सर्व बालकांना संरक्षित करण्यासाठी ही विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. तरी पालकांनी पालकांनी आपल्या नजीकच्या नगरी आरोग्य केंद्रामध्ये संपर्क साधून आपल्या बालकाचे लसीकरण पूर्ण करून घ्यावे असे आवाहन आयुक्त शीतल तेली-उगले त्यांनी केले आहे.

## उत्तरमध्ये १२ ग्रामंचायतीत ५७ मतदान केंद्र

✔ **उत्तर सोलापूर** : उतर तालुक्यातील १२ ग्रामंचायतींच्या सरपंच १२ व सदस्य पदासाठी १८ डिसेंबर रोजी साडेसात वाजल्या पासून मतदानाला सुरुवात होणार आहे. शांततेत, निर्भिपणे व सुरळीत पणे मतदान होण्यासाठी पूर्ण तयारी करण्यात आली असल्याची माहिती तहसीलदार जयवंत पाटील यांनी दिली आहे. १२ ग्रामंचायतमध्ये ५७ मतदान केंद्र, २८५ अधिकारी व कर्मचारी, ५७ शिक्षक, २० पोलीस कॉन्स्टेबल अधिकारी, ५७ सहायक कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. पाकणी, कारंबा व मार्डी हे गाव संवेदन शिल असल्याने विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सरपंच पदासाठी ४७ व सदस्य पदासाठी ३११ उमेदवार रिंगणात आहेत. मतदारांनी कोणत्याही प्रकारच्या भीती मनात न बाळगता मतदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## व्हॉलिबॉल स्पर्धेत गणपतराव साठे जि.प.प्रशालेस दुहेरी मुकुट

✔ सुराज्य/माढा

माढ्यातील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेच्या १४ वर्षाखालील आणि १७ वर्षाखालील मुलांच्या संघांनी जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत क्रमांक पटकावून विभागीय स्पर्धे साठी पात्र ठरला आहे.

त्यांना तहसीलदार तथा तालुका क्रिडा समितीचे अध्यक्ष राजेश चव्हाण यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाना वरून बोलताना संत कुर्मदास कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे यांनी विजेत्या खेळाडूंचे व प्रशालेचे अभिनंदन करताना माढा शहराची खेळाची पूर्वीपासूनची मोठी परंपरा असून सहकार महर्षीनी उभा केलेल्या या प्रशालेत सर्वसामान्यांच्या मुलांचा सर्वांगीन विकास होत असल्याबद्दल सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. राजेश चव्हाण यांनी माढ्यासारख्या ग्रामीण भागातील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेच्या खेळाडूंनी व्हॉलीबॉल मध्ये उत्तुंग यश मिळवीत प्रशालेची यशाची परंपरा कायम राखली असून शाळेच्या विकासासाठी महसूल विभागाचा प्रमुख या नात्याने आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे अभिवचन दिले. कार्यक्रमास यावेळी मुख्याध्यापक नागेश खेडकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष धैर्यशील भांगे, पर्यवेक्षक के.डी.यादव, क्रिडाशिक्षक दिलीप शिंदे यांचेसह आदी उपस्थित होते. विजेत्या संघास माजी शिक्षक दि.कृ.वाघमारे, क्रिडाशिक्षक दिलीप शिंदे किरण शेलार प्रशिक्षक अजय पवार ओंकार पोरे अनिकेत गडदे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल नगराध्यक्षा ॲड मिनलताई साठे, माजी जि प सदस्य झुंजार भांगे, शिक्षणाधिकारी संजय जावीर, गटशिक्षणाधिकारी बंडू शिंदे, मुख्याध्यापक नागेश खेडकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष धैर्यशील भांगे उपाध्यक्षा लिनाताई राऊत सर्व सदस्य आदींनी अभिनंदन केले आहे. प्रास्ताविक क्रिडाशिक्षक दिलीप शिंदे यांनी केले.सूत्रसंचालन किरण शेलार तर आभार प्रदर्शन लक्ष्मण राऊत यांनी केले.




**सहभागी खेळाडू खालीलप्रमाणे १४ वर्षे वयोगट**
सुशांत पालकर सार्थक कापसे आदित्य शेलार शौर्य गवळी अथर्व पवार शिवतेज साठे ओम माने चैतन्य माळी संकेत कोल्हे प्रणय फरतडे यश कदम आर्यन पेटाडे. १७ वर्षे वयोगट तेजस पवार प्रणव शिंदे शंतनु साठे उदय भांगे संकल्प भांगे निसर्ग कुंभार संस्कार कांबळे रामराजे साठे वाहिद शेख आनंद शिंदे प्रतिक फरतडे आनंद माळी.

## शनिवारपासून तपोरत्नं बौद्धिक व्याख्यानमाला

✔ सुराज्य/सोलापूर

नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त शनिवार दि.१७ ते १९ डिसेंबर पर्यंत बौद्धिक व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि.१७ रोजी सांगलीचे युवा व्याख्याते व समाज प्रबोधनकार वसंत हंकारे हे 'चला जगूया आनंदाने' या विषयावर पहिले पुष्प गुंपणार आहेत. रविवार दि. १८ रोजी सोलापूरचे शिवचरित्रकार व आयुर्वेदाचार्य डॉ. शिवरत्न शेटे हे 'चला निरोगी राहू या' या विषयावर दुसरे पुष्प गुंपणार आहेत तर सोमवार दि.१९ रोजी ग्रामीण लेखक अहमदपूरचे मोहिब कादरी हे 'यशस्वी जीवनाचे सूत्र' या विषयावर शेवटचे तिसरे पुष्प गुंफणार आहेत.



महाराष्ट्रातील नामवंत वक्त्यांची व्याख्यान ऐकण्यासाठी श्रोत्यांनी आकाशवाणी रोडवरील नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल येथे सायंकाळी ६.३० वाजता उपस्थित राहून बौद्धिक व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी केले आहे.

## अकलूजच्या फार्मसी कॉलेजमध्ये मतदार नाव नोंदणी शिबीर

✔ **अकलूज** : अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ च्या कॉलेज ऑफ फार्मसी व तहसील कार्यालय माळशिरसचे संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मतदार नाव नोंदणी शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला व नवीन मतदार म्हणून नोंदणीसाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यात आली होती. शिबिरात महाविद्यालयाचे एन.एस.एस विभाग प्रमुख प्रा.बी.एस.अंकलगी, प्रा.डॉ.अनिल भानवसे व माळशिरस तहसिलचे नायब तहसिलदार यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी माळशिरस तहसिलचे कर्मचारी किसन शिंदे व कलकुटे यांचे सहकार्य लाभले.

## शनिवार पेठेतून दुचाकी पळवली

✔ सुराज्य/सोलापूर

अज्ञात चोरट्याने शनिवार पेठ येथे घरासमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र. एम.एच.१३. बी. एच.०४१२ हि चोरून नेली आहे. ही घटना दि.८ ते ९ डिसेंबर दरम्यान घडली. याप्रकरणी जबिउल्ला अहमद वाडी (वय-३५, रा.शनिवार पेठ विजापूर वेस) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोह.शेख हे करीत आहेत.



बाळे येथील वाणी गल्लीतील प्रभाशाली क्लिनिकचे उद्घाटन करताना डॉ. प्रसन्नजीत कासेगावकर. सोबत डॉ. ओंकार भालेकर, प्रभाकर भालेकर, अतिश भालेकर, स्वाती भालेकर, पांडुरंग चौधरी दिसत आहेत.



## मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये क्रीडा सप्ताह

✔ **सोलापूर** : हत्तुरे नगर येथील श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालयामध्ये क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली. या क्रीडा सप्ताहाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री वैजिनाथ हत्तुरे सर होते. यावेळी धरेप्पा हत्तुरे, पर्यवेक्षक गिरमल्ला बिराजदार उपस्थित होते. या क्रीडा सप्ताहामध्ये खो-खो, कबड्डी, सॉफ्टबॉल, बेसबॉल, संगीत खुर्ची,लंगडी,लिंबू चमचा आधी खेळ घेतले जाणार आहेत. यावेळी प्रतीक्षा बिडवे यांनी खेळाचे महत्व सांगितले. मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे सर यांनी खेळामुळे सर्वांगीण विकास होतो व यश-अपयश पचविण्याची सवय शालेय जीवनात लागते, असे प्रतिपादन केले. क्रीडा सप्ताहास क्रीडाशिक्षक गंगाराम घोडके, बसवेश्वर बुरकुल, बसवराज कोरे उपस्थित होते. प्रास्ताविक परमेश्वर चांदोडे यांनी केले. सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले. तर आभार रमेश आगवणे यांनी मानले.

## मतदाना दिवशी आठवडी बाजार बंद

✔ **सोलापूर** : सोलापूर जिल्ह्यात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींचा निवडणुकीसाठी १८ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. मतदाना दिवशी माळशिरस तालुक्यातील सदाशिवनगर व दक्षिण सोलापूर तालुक्यातील आचेगांव, धोत्री येथील आठवडे बंद राहणार आहेत. मतदाना दिवशी मतदान प्रक्रियेत कोणताही अडथळा येवू नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबादीत रहावी यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (३) अन्वये मतदाना दिवशी माळशिरस व दक्षिण सोलापूर तालुक्यातील सदर गावांतील आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर यांनी दिले आहेत.

## सशस्त्र सेना ध्वजदिनानिमित्त २० डिसेंबरला निधी संकलन


✔ **सोलापूर** : सोलापूर जिल्हा ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ २० डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ कार्यक्रम व ध्वजदिन २०२१ निधी संकलनाचे उत्कृष्ठ संकलन केलेल्या कार्यालयांना पारितोषिक वितरण सभारंभ बहुउद्देशीय सभागृहात होणार असल्याची माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी दिली. या कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी , आयुक्त शीतल उगले- तेली, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास जिल्हयातील शासकिय निमशासकिय कार्यालयांचे प्रमुख, जिल्हयातील माजी सैनिक, विधवा, वीरमाता- पिता व वीरपत्नी यांनी उपस्थित रहावे असे आवाहान जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

## निर्मला कारमपुरी यांचे निधन



✔ **सोलापूर** : शेळगी जयलक्ष्मी सोसायटी येथील रहिवासी सौ. निर्मला दत्तात्रय कारमपुरी (वय ५१) यांचे गुरुवारी (दि.१५) निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक विवाहित मुलगी, सासू-सासरे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवारी सकाळी १० वाजता राहत्या घरापासून निघणार आहे. माजी महापौर जनार्दन कारमपुरी यांच्या त्या सून तर पूर्व विभाग वाचनालयाचे माजी अध्यक्ष दत्तात्रय कारमपुरी यांच्या पत्नी होत.

## हाजी सलाम हकीम यांचे निधन



✔ **सोलापूर** : सिद्धेश्वर पेठ येथील निवृत्त शिक्षक हाजी अ.सलाम करीम हकीम यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी सायंकाळी निधन झाले. मृत्यू समय ते ८० वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात २ मुले,४ मुली, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवारी २ वाजता सिद्धेश्वर पेठ, फाईव्ह स्टार हॉटेलजवळील राहत्या घरापासून निघणार आहे.

## भटुंबरे, चिंचोलीत महसूल विभागाची वाळूमाफियांवर कारवाई

✔ **पंढरपूर** : महसूल विभागाने गुरूवारी वाळू माफियावर कारवाई केली आहे. वाळू माफिया वाळू उपसा करण्यासाठी होडीचा वापर करतात. त्या होड्या महसूल विभागाने फोडल्या आहेत. भटुंबरे परिसरात २ आणि चिंचोली भोसे परिसरात २ अश्या एकूण ४ होड्या फोडण्यात आल्या आहेत.

पंढरपुर तालुक्यात होणारी वाळू चोरी रोखण्यासाठी चोरीची वाळू विकत घेणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कारवाई किंवा त्याच्या जागेवर बोजा चढवण्याची कारवाई महसूल विभागाच्या वतीने करण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. बुधवारी पंढरपुरात एका ठिकाणी वाळू साठ्याचा पंचनामा केला आहे. त्याच्यावर कारवाई करण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे. गेल्या काही दिवसापासून पंढरपूर तालुक्यातील नदीकाठी भरमसाठ वाळू उपसा सुरू आहे. वाळू माफियांना लगाम लावण्यासाठी तहसीलदार सुशील बेल्हेकर यांनी वाळू चोरी नियंत्रण पथक तैनात केले आहे. गेल्या महिन्यात देखील महसूल विभागाने अकरा होड्या फोडल्या होत्या. तहसीलदार सुशील बेल्हेकर यांच्या कार्यकाळात ४० ते ५० होड्या फोडण्यात आल्या आहेत. गुरूवारी प्रांताधिकारी गजानन गुरव, तहसीलदार बेल्हेकर यांच्या नेतृत्वाखाली तलाठी वाघमारे, प्रशांत शिंदे, श्रीकांत कदम, दत्ता कोताळकर व कोतवाल तानाजी लोंढे, भैया शिंदे, देवा सावंत यांनी कारवाई करत ४ होड्या कटरच्या साहाय्याने फोडण्यात आल्या आहेत.



**कारवाई केवळ पंढरपुर पुरतीच मार्यादित? :** होड्या फोडण्याची कारवाई नेहमी प्रमाणे पंढरपुर शहर आणि जवळपास करण्यात आली आहे. काही केल्या वाळू बंद न होणाऱ्या गोपाळपूर, मुंढेवाडी,चळे, आंबे, सरकोली, या भागात होताना दिसून येत नाही. पंढरपुर शहर आणि जवळपासचे मंडल अधिकारी, तलाठी कारवाई करतात, नदीकाठच्या इतर गावात कारवाई होताना दिसत नाही.

## वृद्धेच्या गळ्यातील सोन्याची माळ लंपास

✔ **सोलापूर** : एक्स-रे काढण्यासाठी आलेल्या वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची माळ चोरून नेण्याची घटना दि.१२ डिसेंबर रोजी आदर्श हॉस्पिटल रेल्वे लाईन येथील एक्स-रे रूममध्ये रात्री पावणेदहा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी मिथुन राम पाथरे (वय-३२,रा. न्यू तिऱ्हेगाव,फॉरेस्ट रेल्वे लाईन) यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी हे काम करत असलेल्या आदर्श हॉस्पिटल मध्ये सुनिता वामन नारकर (वय-७०,रा.कांदेवली, मुंबई) हि वृद्ध महिला उपचारासाठी आली होती.




त्यावेळी त्यांना एक्स-रे रूम मध्ये घेऊन गेले असता,त्यांच्या गळ्यातील माळ एका रूम मधील टेबलावर ठेवली होती.दरम्यान एक्स-रे काढून झाल्यावर पुन्हा ती माळ घेण्यासाठी रूममध्ये गेल्या असता ती सोन्याची माळ मिळून आली नाही.त्यावेळी सगळ्यांना विचारपूस केली असता,कोणीतरी आज्ञात चोरट्याने एक्स-रे मशीनच्या रूममध्ये प्रवेश करून ६० रुपये किमतीची सोन्याची माळ चोरून नेली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोह.मुलाणी हे करित आहे.

### घरातून चोरट्याने मोबाईल पळविला

सोलापूर (प्रतिनिधी) अज्ञात चोरट्याने घरातून २५ हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना दि.१४ डिसेंबर रोजी घडली.याप्रकरणी गुरुराज गोपाळराव कुलकर्णी (वय-६५,रा.मंजुषा हाऊसिंग सोसायटी,विकास नगर) यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांच्या घरातील त्यांची मुलगी समिधा ही मोबाईलवर ऑनलाईन काम करून बेडवर मोबाईल ठेवून झोपी गेली.त्यावेळी बेडरूमची खिडकी उघडी असल्याने अज्ञात व्यक्तीने बेडरूम मध्ये प्रवेश करून मोबाईल चोरून नेला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास पोह.आटूळे हे करीत आहेत.



## वेळापूर पोलिसांचा शहरातून रूट मार्च

✔ **वेळापूर** : वेळापूर (ता. माळशिरस) येथे वेळापूर पोलीस स्टेशनच्या वतीने वेळापूर ग्रामपंचायत निवडणूक २०२२ निवडणुकीच्या अनुषंगाने १५ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी दहाच्या सुमारास वेळापूर शहरातून रूट मार्च काढण्यात आला. निवडणुकीत कोणताही वाद होऊ नये, शांततेच्या मार्गाने निवडणुकीचा प्रचार व्हावा, कोणताही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांनी पोलीस कर्मचाऱ्यांसह वेळापूर शहरातून अर्धनारीनटेश्वर मंदिर, पालखी चौक, एसटी बस स्टँड वेळापूर, काळा मारुती मंदिर, मस्जिद, व्यापार पेठ, तलाठी कार्यालय, वेळापूर ग्रामपंचायत कार्यालय, सांगोला-अकलूज रोड या मार्गावरून पोलीस रूट मार्च काढण्यात आला. या रूट मार्चमध्ये संजय राऊत, उपसपोनी, संजय रेणुके यांच्यासह कर्मचारी सहभागी झाले होते.



## अन्न औषध विभागात जिंतूरकर रूजू

✔ **सोलापूर** : अन्न व औषध प्रशासन विभागात दोन सहाय्यक आयुक्त दिले आहेत. गुरुवारी परभणीचे सुनील जिंतूरकर रुजू झाले आहेत. सहाय्यक आयुक्त प्रदीपकुमार राऊत यांनी त्यांचे स्वागत केले. अन्न प्रशासनामध्ये सोलापूर शहर व जिल्ह्यातील तालुके विभागून देण्यात आले आहेत. राऊत यांच्याकडे सोलापूर शहरासह, बार्शी, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर हे तालुके आहेत. तर सुनील जिंतूरकर यांच्याकडे मोहोळ, सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, माढा, उत्तर सोलापूर, करमाळा हे तालुके आहेत. जिंतूरकर हे अन्न सुरक्षा अधिकारी पदावरून पदोन्नतीने आले आहेत त्यांनी यापूर्वी हिंगोली, नांदेड, जालना, परभणी याठिकाणी काम केले आहे. अन्न विभागाला दोन अधिकारी आल्याने कामाचे विभाजन होईल, नियंत्रण ठेवले जाईल. सध्या अन्न विभागात सुरक्षा अधिकाऱ्याच्या ९ जागा मंजूर त्यापैकी जागा ३ रिक्त आहेत.



## कृषिदुतांकडून कणबस येथील शेतकऱ्यांना मार्गदर्शन

✔ **सोलापूर** : गेल्या दोन-तीन वर्षापासून मिरचीवरील बोकड्या/चुराडा मुरडा (लिफ कर्ल) हा रोग व पांढ-या माशीमुळे बहुतांश शैतकऱ्यांचे पीक हातचे गेले. यावर्षीही सोलापूर जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी या रोगाची लागण मिरचीवर झालेली आहे. त्यामुळेच ग्रामीण कृषी कार्यानुभव अंतर्गत लोकमंगल कृषी महाविद्यालय, वडाळा येथील कृषीदूतांनी कणबस येथे मिरची पिकवरिल रसशोषक किडींचे व चुरडा मुरडा रोगाचे एकात्मिक किड नियंत्रण याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी कृषिदूत प्रशांत सुर्यवंशी, अजिक्य खंदारे, शिवराज रसाळ, दिलीप नाडेकर, श्रीधर सावळी,शेतकरी अर्जुन गुरव, बसवराज गुरव काशिनाथ बिराजदार, मुत्तु कलशेट्टी, श्रीशैल बिराजदार, राजु कटारे, रतिकांत बिराजदार, विठ्ठल बिराजदार, राहुल सावळी, राम कोरे, गुरूषांत कुंभाऱ्यांसह गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सचिन फुगे, कीटकशास्त्र विषयतज्ज्ञ प्रा.रविंद्र पालकर यांनी मार्गदर्शन केले.



## मनसेकडून पंढरपुरातील मुस्लीम स्मशानभूमीत सिमेंट कॉंक्रेट रस्ते

✔ **पंढरपूर** : पंढरपुरातील हिंदू स्मशान भूमीच्या सुशोभीकरणानंतर आता पंढरपुरातील मुस्लिम समाजाच्या बडा कब्रस्तानातील सुशोभीकरण आणि अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण करून देण्यास सुरुवात झाली आहे.हे रस्ते कॉंक्रिटीकरण हे मनसे नेते दिलीप धोत्रे हे स्वखर्चातून करत आहे. संत पेठेत असणाऱ्या बडा कब्रस्तान पासून कॉंक्रिटीकरणाची सुरुवात झाली. यावेळी नगरपालिकेचे विरोधी पक्षनेते सुधीर धोत्रे, मनसे व्यापारी सेलचे जिल्हाध्यक्ष जयवंत भोसले, नगरसेवक लखन चौगुले, बाळासाहेबांची शिवसेनेचे जिल्हा संघटक संजय बंदपट्टे, राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव श्रीकांत शिंदे, मी वडार महाराष्ट्राचे जिल्हाध्यक्ष दत्ता भोसले ,नगरसेवक शिवाजी मस्के, महंमद उस्ताद, नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष शशिकांत पाटील आदी उपस्थित होते..

# स्मार्ट सिटी अंतर्गत झालेल्या कामांमध्ये अनियमितता झाल्याची चेअरमन गुप्तांची कबुली

## ● चौकशीअंती संबंधितांवर कारवाई करण्याची ग्वाही

✔ **सोलापूर** : सोलापूर स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत झालेल्या काही कामांमध्ये अनियमितता झाली हे मान्य आहे. अनियमितता करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. याप्रकरणी चौकशी अंती संबंधितांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्टीकरण स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनचे चेअरमन असीम गुप्ता यांनी दिले.

महापालिका आवारातील इंद्रभुवन या इमारतीच्या नूतनीकरणाची पाहणी करण्यासाठी आले असताना पत्रकारांशी बोलताना चेअरमन असीम गुप्ता यांनी ही माहिती दिली. यावेळी महापालिका आयुक्त तथा स्मार्ट सिटीचे सीईओ शितल तेली - उगले, नगर अभियंता संदीप कारंजे उपस्थित होते. चेअरमन असीम गुप्ता पुढे म्हणाले, सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या अंतर्गत शहरात पाणी खेळ जुने मार्केट मूलभूत सोयी सुविधा ड्रेनेज लाईन यासह महत्त्वाची कामे हाती घेण्यात आली आहेत. आवश्यक त्या कामांचीच निवड या योजनेतंर्गत करण्यात आली आहे. दरम्यान, स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत झालेल्या



काही कामांमध्ये अनियमितता असल्याच्या या तक्रारी आहेत. तांत्रिकदृष्ट्या खात्री न करता कोटेशवर्धीच्या बिले काढण्यात आली. एकाच दिवशी कामाची वर्क ऑर्डर आणि कंपनीने रिव्हयुव्हड म्हणून ११ कोटींचे बील अदा करण्यासंबधाने पत्र दिले. हे स्मार्ट काम मात्र वर्क ऑर्डर देण्यापूर्वीच दोन महिने अगोदरच पूर्ण झाल्याची माहिती पुढे आली आहे. यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात चेअरमन असीम गुप्ता म्हणाले, स्मार्ट सिटी योजनेतील त्या कामांमध्ये अनियमितता झाली आहे, हे मान्य आहे. अनियमितता करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. आवश्यक ती चौकशी करण्यात येणार असून त्यानंतर संबंधितांवर कारवाई केली जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### ■ गर्व वाटेल असे इंद्रभुवनचे नूतनीकरण झाले

इंद्रभवन नूतनीकरणाचे काम स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत करण्यात येत आहे हे काम अंतिम टप्प्यात आहे. या इमारतीची पाहणी चेअरमन असीम गुप्ता यांनी गुरूवारी दुपारी केली. नूतनीकरण काम हे अत्यंत चांगल्या पद्धतीने झाले आहे. सर्वांना पाहून गर्व वाटेल अशीही इमारत आता झाली आहे. ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा प्रयत्न स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत करण्यात आला आहे. नव्या पिढीला हा वारसा पाहता येईल, ही समाधानाची बाब आहे, असेही ते म्हणाले.

### ■ स्मार्ट सिटी योजनेसाठी पुरेसा निधी उपलब्ध

सोलापूर स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत विविध विकास कामे मार्गी लागले आहेत. दरम्यान, उर्वरित कामांसाठी कोणत्याही प्रकारचा निधी कमी नाही. सुमारे १४ ते १५ कोटी रुपयांच्या निधीची अडचण असू शकते मात्र ती एँडजेस्ट होऊ शकते. पुरेसा निधी उपलब्ध आहे, असेही असीम गुप्ता यांनी सांगितले.

# बंदच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा कडक बंदोबस्त

## प्रशासनास सहकार्य करावे : पोलीस उपायुक्त विजय कबाडे

✔ **सोलापूर** : सोलापुर बंदच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन सज्ज असून त्या अनुषंगाने सर्व सोलापूर शहरात पोलीस बंदोबस्त तैनात असणार आहे. या बंदवेळी सर्व पक्ष,संघटना आणि नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन शहर पोलीस उपयुक्त विजय कबाडे यांनी केले आहे.

गेल्या महिन्याभरापासून राज्यात सत्तेत असलेल्या भाजप तसेच राज्यपाल यांनी महापुरुषावर केलेल्या कथित अपशब्दामुळे वातावरण ढवळून निघाले आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी सोलापूर बंदचे आवाहन दिले आहे परंतु सत्ताधारी आणि विरोधी पक्ष असे दोन गट पडल्याने आजच्या बंदवर गटातटाची सावट आहे.उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते पुरुषोत्तम बरडे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी ही बंदची हाक दिली आहे.तर दुसरीकडे



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षातील अमोल शिंदे, दिलीप कोल्हेसह त्यांच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी यांनी मात्र बंदला विरोध केला आहे.बंदच्या हाकेला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या जवळपास सर्व गटांनी तसेच इतर छोट्या मोठ्या सामाजिक संघटना राजकीय संघटना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांनीही पाठिंबा देत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. हा बंद अत्यावश्यक सेवा वगळता दुपारी दोन पर्यंत ठेवण्यात आला आहे.

दरम्यान शहरात कोणत्या प्रकारे अनुचित प्रकार घडु नये म्हणुन पोलीस प्रशासनाने बंदोबस्ताची मोठी तयारी केली आहे.चौका चौकात पेट्रोलिंग, प्रतिसाद पथक नेमण्यात आले असून या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून रेकॉर्डवर असणाऱ्या गुन्हेगारावर वॉच ठेवण्यात आला आहे.तर काहींची धरपकड केली आहे.या बंदमध्ये नागरिकांना कोणत्याही प्रकारे नागरिक तसेच व्यापाऱ्यांना कोणत्या प्रकारे बळजबरी होणार नाही. अशी दक्षता घेण्याचे सक्त आदेश पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी दिले आहेत.

### असा असणार पोलीस बंदोबस्त

शहरात आज होणाऱ्या बंदच्या पार्श्वभूमीवर शहर पोलीस आयुक्तालय यांनी कडक बंदोबस्ताचे नियोजन केले असून यात ९ वरिष्ठ पोलीस निरीक्षक, २७ सहाय्यक पोलीस निरीक्षक, १५४ पोलीस कर्मचारी, ४ आरसीपी प्लॅटून, ९ स्टेकिंग फोर्सेस व साध्या वेशातील पोलीस बंदोबस्तासाठी तैनात केले आहेत.

## पती-पत्नीचा व्हिडिओ काढणाऱ्या तरुणावर गुन्हा

✔ **सोलापूर** : नवीन लग्न झालेल्या जोडप्यांचे रात्रीच्या सुमारास शारीरिक संबंधाचे दरवाज्याच्या फटीतून चोरून मोबाईलवर व्हिडिओ शूटिंग काढणाऱ्या शेजारी राहणाऱ्या तरुणाच्या विरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. याबाबत मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी पीडित महिला ही आपल्या पती व नातेवाईका समवेत शहरातील एका भागात राहते. बुधवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घरातील सर्वजण जेवण करून टीव्ही बघत बसले होते.

मध्यरात्रीच्या सुमारास ते दोघे नवीन जोडपे एका रूममध्ये झोपले असताना शेजारी राहणाऱ्या तरुणाने दरवाज्याच्या फटीतून रूम मधील दृश्य काढले.ही बाब त्या दोघांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी घराबाहेरून पाहिले असता तो तरुण पळून गेला.पीडित विवाहितीने याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात त्या तरुणाच्या विरोधात फिर्याद दाखल केली असून,त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## 'धनगड' ऐवजी 'धनगर' उल्लेख असलेली अधिसूचना प्रकाशित करा

### — खा.नाईक-निंबाळकर यांची लोकसभेत मागणी —

✔ **सोलापूर** : माढा लोकसभा मतदारसंघासह संपूर्ण राज्यात धनगर समाज मोठ्याप्रमाणात आहे. राज्य शासनाच्या सुचीसह केंद्राच्या सुचीमध्ये धनगर ऐवजी धनगड असा उल्लेख केलेला आहे. याबाबत केंद्र सरकारने ठोस पावले उचलून धनगड ऐवजी धनगर उल्लेख असलेली अधिसूचना प्रकाशित करावी, अशी मागणी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी लोकसभेत केली आहे.



खा.निंबाळकर म्हणाले, १९६१ मध्ये तयार केलेल्या ग्रंथ सूचीत धनगड असा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र देवनागरी भाषेत त्याचा उच्चार व उल्लेख हा धनगर म्हणूनच करण्यात येतो. कोणत्याही इतर दस्तऐवजामध्ये धनगड असा उल्लेख आढळून आलेला नाही. राज्य सरकारच्या वतीने तयार केलेल्या सूचीमध्ये धनगर असाच उल्लेख आहे. १९५० पासून आजपर्यंत राज्यात अनुसूचित जातींच्या सूचींमध्ये एकुण ३६ जातींचा समावेश आहे. त्यामध्ये धनगड या जातींचे प्रतिनिधीत्व शून्य आहे. ही बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारने याबाबत तातडीने कार्यवाही करावी, मागणी त्यांनी केली.

## सेंट्रल बॅंक परिसरात तलवारीने मारहाण तरुण जखमी

✔ **सोलापूर** : सलगर वस्ती परिसरातील सेटलमेंट फ्री कॉलनी येथे पूर्वीच्या भांडणावरून तलवार आणि हॉकी स्टिक केलेल्या मारहाणीत वसंत सदाशिव हातागळे (वय २९ रा.सेटलमेंट फ्री कॉलनी नं.६) हा तरुण जखमी झाला. ही घटना आज गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. हरीश मारुती जाधव आणि त्याचा भाऊ सतीश जाधव या दोघांनी मारहाण केली. अशी नोंद सलगर वस्ती पोलिसात झाली आहे.





### तलवारीने मारहाण दोघे जखमी

✔ **सोलापूर** : कामासाठी जात असताना वाटेत अडवून तलवार आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले. ही घटना मद्रे (ता.दक्षिण सोलापूर) येथील नदीच्या बंधाऱ्याजवळ गुरुवारी सकाळच्या सुमारास घडले घडली. प्रकाश गुलाब पवार (वय ४३) आणि त्याचा भाऊ सुनील गुलाब पवार (रा. आनंदनगर, मद्रे) अशी जखमींची नावे आहेत.त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. ते दोघे सकाळी सात वाजेच्या सुमारास कामासाठी निघाले होते. सीना नदीच्या बंधाऱ्याजवळ त्यांना अडवून तमन्ना शंकर सोनकटले आणि त्याचा मुलगा संतोष दोघांनी मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### स्पिड ब्रेकरवरून पडलेल्या महिलेचा मृत्यू

✔ **सोलापूर** : मुलाच्या दुचाकीवरून प्रवास करताना खाली पडून जखमी झालेल्या अलकाबाई दत्ता मोरे (वय ५३ रा. महालक्ष्मी नगर, अक्कलकोट रोड सोलापूर) या शासकीय रुग्णालयात उपचार घेताना गुरुवारी पहाटे मरण पावल्या. त्या ४ डिसेंबर रोजी दुपारच्या सुमारास मुलाच्या दुचाकी पाठीमागे बसून तोरंबा (जि.उस्मानाबाद) येथून सोलापूर कडे निघाल्या होत्या. तुळजापूरच्या अलीकडे स्पीड ब्रेकर वरून गाडी उडाल्याने त्या खाली पडून जखमी झाल्या होत्या. तुळजापूर येथे प्राथमिक उपचार करून त्यांना सोलापुरात दाखल करण्यात आले होते.

### आहेरवाडी येथे आत्महत्येचा प्रयत्न

आहेरवाडी (ता.दक्षिण सोलापूर) येथे राहणाऱ्या सरदार चांदसाब शेख (वय ३१) याने राहत्या घरात विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. बुधवारी सायंकाळी हा प्रकार घडला. त्याला बंकलगी येथे प्राथमिक उपचार करून सिद्धाराम बाके (शेजारी) यांनी शासकीय रुणालयात दाखल केले. एक वर्षांपूर्वी त्याच्या पत्नीचे निधन झाले होते. निराशेच्या भरात त्याने हा प्रकार केला. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## विमानसेवेसाठी विचार मंचतर्फे आज हलगीनाद

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूरच्या होटगी रोड विमानतळावरून रखडलेल्या विमानसेवेसाठी सोलापूर विचार मंच तर्फे दिनांक १६ रोजी सकाळी साडेदहा ते साडेअकरा वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, पुनम गेट येथे प्रशासनाचा निषेध करण्यासाठी हलगी नाद आंदोलन आयोजित केले आहे त्यात सोलापुरातील सर्व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा असे आवाहन विचार मंच तर्फे करण्यात आले आहे.



साखर कारखान्याच्या ९२ मीटरच्या अनधिकृत चिमणी पाडकामा बाबत डीजीसीए चा निकाल न लागल्यामुळे तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंग मिटींग पुढे ढकलली असून, डीजीसीएने २ आठवड्यात अंतिम निकाल देत असल्याचे सांगितले आहे. परंतु त्यांनी महापालिका व त्यांचा काहीही संबंध नसल्याचेदेखील सांगितलं आहे. परंतु गेल्या सहा महिन्यापासून साखर कारखान्याच्या चिमणीच्या सुनावणी बाबत मागील आयुक्त पी शिवशंकर व आता आलेल्या नवीन आयुक्त तेली उगले या मुद्दाम काही ना काही कारण देऊन चालढकल करून चिमणीस अभय देत आहेत. व केवळ या एका कारणामुळे सोलापूरच्या होटगी रोडवरील नागरी विमान सेवेचा मार्ग रोखून धरला आहे.त्यामुळे आता महानगरपालिका वेळकाढूपणा करीत असल्याचे स्पष्ट होत आहे, यासाठी प्रशासनाचा निषेध म्हणून आपण शुक्रवारी झोपलेल्या प्रशासनास जाग करण्यासाठी १०.३० ते ११.३० जिल्हाधिकारी कार्यालय, पूनम गेट येथे हलगीनाद आंदोलन करीत आहोत, असे विचार मंचतर्फे करण्यात आले आहे.

## फेस ऑफ सोलापूर स्पर्धेसाठी नावनोंदणी

✔ **सोलापूर** : व्हायब्रन्ट इन्स्टिटयूट द्वारे रविवार दि.८ जानेवारी रोजी फेस ऑफ सोलापूर स्पर्धा आयोजित करण्यात माहिती संचालिका सोनल जव्हेरी यांनी दिली आहे. ह्या स्पर्धेचे हे तिसरे वर्ष आहे. ह्यावर्षी किड्स, मिस्सी, मास्टर, टिन, मिस, मिस्सेस व मिस्टर फेस ऑफ सोलापूर अश्या विविध किताबासाठी स्पर्धा घेण्यात आल्या आहेत. स्पर्धेसाठी रविवार दि. २५ डिसेंबर रोजी मेकॅनिक चौक येथील डीएफसी जिम येथे चाचणी घेण्यात येणार आहेत. पूर्व नाव नोंदणी आवश्यक असून इच्छुकांनी सोनल जव्हेरी यांच्याशी दूरध्वनी क्रमांक ९८९००६३४४८ वर किंवा होटगी रोड येथील व्हायब्रन्ट इन्स्टिटयूट येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.



## एसव्हीसीएस प्रशालेच्या सहलीत २७० विद्यार्थ्यांचा सहभाग

✔ **सोलापूर** : एसव्हीसीएस प्रशाला एमआयडीसीची आयोजित केलेली शैक्षणिक सहल प्रशालेचे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे व पर्यवेक्षक विलास म्हमाणे यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली. या सहलीत २७० विद्यार्थी २४ शिक्षक व दोन शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी सहलीत हरिहरेश्वर येथील महादेव मंदिर, दिवेआगार येथील गणपती मंदिर, रायगड येथील किल्ला आणि महाबळेश्वर येथील इको पॉईंट, मॅप्रो गार्डन, महाबळेश्वर येथील स्थळांना भेट देत या ठिकाणची माहिती देण्यात आली. यावेळी संतोष तारके यांनी सहलीचे नियोजन केले होते. यावेळी जीवराज फुलारे, राजकुमार तंबाके आदी सहभागी झाले.

# 'वृतांजली कविता बांधणीची' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

✔ सुराज्य/सोलापूर

बारामती येथे झालेल्या साहित्य सेवा प्रज्ञा मंचाच्या सातव्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनात सोलापूरच्या कवियत्री डॉ.विद्या देशपांडे (बालरोगतज्ञ) यांच्या वृत्तांजली कविता बांधणीची या काव्य संग्रहाचे प्रकाशन गझलकार देगलूरकर यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभियंता आणि ख्यातनाम गझलकार किशोर मिश्रा होते. व्यासपीठावर श्रीनिवास गडकरी,



डॉ. ऋषिकेश जाधव डॉ.राजेंद्र केंगार संमेलनाच्या संयोजिका गझलकारा लीना देगलूरकर यांची उपस्थिती होती.

कोणत्याही काव्यसंग्रहासाठी आवश्यक असे काव्य विषयातले वैविध्य या वृत्तांजली कविता बांधणीची काव्यसंग्रहात आहेत. हल्ली वृत्त बद्ध कविता फार क्वचित लिहिली जाते. बहुतेक कविंचा वृत्तांचा अभ्यास नसल्याने त्यांचा मुक्त छंदाकडे ओढा असतो. ते पाहता डॉ. विद्या देशपांडे यांच्या कविता संग्रहाचा विशेष उल्लेख करावा लागेल, असे मत ज्येष्ठ गझलकार लीना देगलूरकर यांनी व्यक्त केले.

या काव्यसंग्रहाला कवी आणि गीतकार वैभव जोशी यांची प्रस्तावना लाभली असून अक्षर गणवृत्ते, मात्रिक वृत्ते, अर्धसमवृत्ते, आणि अक्षर छंद यांचा वापर करून आपण काव्य लेखन केल्याचं डॉ. विद्या देशपांडे यांनी आपल्या प्रस्ताविकेतून पहिल्या काव्यसंग्रहाविषयी बोलताना सांगितले. गझलकार मिश्रा म्हणाले की, या काव्य - संग्रहातील बुचाचे झाड या कवितेतून फुलांचा आगळावेगळा सुगंध नाकी भरून घेतला की मन सुद्धा भरते. या कवितेने तुमच्यातील मूळ संवेदना आणि निसर्गाकडे शांत चित्ताने व हळुवारपणे तो अनुभवा असा अबोल संदेश या काव्यसंग्रहातून रुजतो. राजा धर्माधिकारी श्री श्रीनिवास गडकरी यांनी डॉ. विद्या देशपांडे यांचा मूळ पिंडच या कवितेतून डोकावतो असे सांगून त्यांच्या अनेक कवितांची मुक्तकंठाने प्रशंसा केली. या संमेलनात निमंत्रितांचे काव्यसंमेलन झाले.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM TENDER NOTICE**

| Sr. No. | Tender No. | Tender Details | Tender / Enquiry RFx No. | Amount | EMD | Tender Fee | Tender Publication Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/EHV/ O&M/ SUR/ SRM/T-21/ 2022-23 | Due Date Extension Notice of SRM Tender for the Work of annual maintenance contract for periodic maintenance of yard lighting system at various EHV Substations as and when required under jurisdiction of EHV O & M Division, Solapur. | **RFx No.: 7000025392** | Rs. 25,00,000/- Including Taxes | Rs. 25,000/- | Rs. 525/- Including GST | From 10.12.2022 @ 09:00 Hrs To 16.12.2022 up to 17:00 Hrs |
| 2 | EE/EHV/ O&M/ SUR/ SRM/T-22/ 2022-23 | SRM Tender for the Work of Repair, Overhauling & Servicing, Maintenance, Alignment of 220/132/33KV Isolator available at various 220/132KV Substations under jurisdiction of Trans. O&M Division, Solapur. | **RFx No.: 7000025458** | Rs. 25,00,000/- Including Taxes | Rs. 25,000/- | Rs. 525/- Including GST | From 09.12.2022 @ 09:00 Hrs To 18.12.2022 up to 16:00 Hrs |

For more details, please visit SRM website **www.mahatransco.in** or **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Details :** Add'l Executive Engineer - 7447441096, Dy. Executive Engineer - 7447441043

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV O&M Division, Solapur**




## स्थापत्य कर्मचारी कृती समितीचे विविध मागण्यांसाठी आंदोलन

✔ **सुराज्य/सोलापूर :** सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे विभाग सोलापूरकडील लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महा कर्मचाऱ्यांना वय वर्षे ४५ ला प्रशिक्षण व विभागीय परीक्षेतून सूट देऊन स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर समावेशित करण्याच्या मागणीसाठी कृती समितीच्यावतीने गेल्या १२ डिसेंबरपासून सोलापूर येथील सिंचन भवनासमोर, अधिक्षक अभियंता कार्यालयासमोर आंदोलन सुरू असल्याचे माहिती अशी माहिती बाबासाहेब झेंडे यांनी दिली. कालबद्ध पदोन्नती व वेतनश्रेणी वाढीपासून २२५ कर्मचारी मुकले केले. आहेत. स्थानिक अधिकाऱ्यांना याचे अधिकार असताना ते टोलवाटोलवी करत आहेत, असं कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. यावेळी एम. एस. देवकते, एन. एल. मंजेली, ए. व्ही. जोशी, एस. एस. फुलारी, सी.आर व्हनमाने, उंदडे आदी उपस्थित होते.



## ग्रामपंचायत कडबगाव येथे दिव्यांग बांधवांना धनादेश वाटप

✔ **सुराज्य/अकलूज :** ग्रामपंचायत कडबगांव येथे दिव्यांग सक्षमीकरण कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी एकूण १८ दिव्यांग बांधवांना वैयक्तिक लाभ म्हणून रु. ५४,०००/- इतके रक्कमेचे धनादेशाचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी सरपंच नसिमा जाफर मुल्ला यांचे अध्यक्षतेखाली व ग्रामविकास अधिकारी प्रेमदास पवार, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष महिबुब मुल्ला, कृषी सहाय्यक चिदानंद खोबण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडले. यावेळी ग्रामविकास अधिकारी प्रेमदास पवार यांनी कार्यक्रमाचे प्रस्तावना करताना दिव्यांगना मिळणाऱ्या योजना व लाभ याबाबत सविस्तरपणे माहिती सांगितले तसेच संजयगांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष महिबुब मुल्ला यांनी मनोगतातून दिव्यांगांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी प्रशिक्षणार्थी ग्रामसेवक एकनाथ, जाफर मुल्ला, महेश पाटील, महातेंश पाटील, शंकर निंबाळकर (तंटामुक्त अध्यक्ष), श्रीमंत व्हसुरे, विठ्ठल अमोगी, विरपाक्ष आहेरवाडी, समीर ढाले, सलीम शेख, चिदानंद स्वामी, शिवण्णा निंबाळकर, श्रीकांत चव्हाण, विजय पाटील, शरणप्पा उडचाण इसुफ शेख, इरण्णा मेलशेट्टी व ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी व ग्रामस्थ आदिंच्या उपस्थितीत हे कार्यक्रम पार पडले.

## डॉ. आंबेडकर वसतिगृहाच्या डागडुजीस सुरुवात

✔ **सुराज्य/अकलूज :** अकलूज येथील सामाजिक न्यायविभाग अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह कार्यरत आहे.

या वसतिगृहाचा प्रश्न ऐरणीवर आला असून विद्यार्थ्यांच्या सोयी सुविधांसाठी अधिक्षक सुभाष भोसले यांनी वस्तीग्रहाच्या डागडुजीच्या कामास सुरुवात केली असून यामध्ये रंगकाम, काचा दुरुस्ती, शौचालय दुरुस्ती व इतर किरकोळ कामांना सुरुवात झाली असून विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसत आहे.

नुकतीच या वसतिगृहाच्या अनेक प्रश्नासंदर्भात प्रांताधिकारी कार्यालयासमोर आंदोलन सुरू करण्यात आले होते. समस्त आंबेडकर चळवळीतून या वसतिगृहाची नवीन इमारत बांधून मिळावी, अशी मागणी होत होती पण जागेअभावी हा प्रश्न रखडलेला दिसतो आहे. पण विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधांसाठी अधिक्षक भोसले यांनी इमारत मालकाकडून दुरुस्तीचे काम सुरू केले असून विद्यार्थ्यांना सुखसुविधा देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट केले.

## जयपूरच्या फिल्म फेस्टिव्हलसाठी 'ताठ कणा' ची निवड

✔ **सुराज्य/सोलापूर :** यंदाच्या १५ व्या 'जयपूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल'मध्ये टॉर्च कॅम्पेन या विभागात डॉ. प्रेमानंद रामाणी यांच्या जीवनकार्यावर आधारित ताठ कणा' या मराठी चित्रपटाची निवड झाली आहे.

या संबंधीची घोषणा नुकतीच मान्यवरांच्या उपस्थितीत एका विशेष कार्यक्रमात करण्यात आली. प्रज्ञा क्रिएशन्सचे विजय मुडशिंगीकर व स्प्रिंग समर फिल्मचे करण रावत यांनी ताठ कणा' चित्रपटाची निर्मिती केली आहे.

या महोत्सवामध्ये निवड झाल्याचा आनंद व्यक्त करताना चित्रपटाचे दिग्दर्शक गिरीश मोहिते म्हणाले की, 'अशा प्रकारचा महोत्सव आयोजित करत त्यांनी टॉर्च कॅम्पेन याअंतर्गत भारतीय चित्रपटांसाठी व्यासपीठ निर्माण केले.'

# सरपंचपदाचे १८ तर सदस्यपदाचे १२६ इच्छुक उमेदवार आमने-सामने

✔ सुराज्य/सांगोला

**१८ डिसेंबर रोजी सहा ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक होऊ घातली आहे. त्यात बाजी मारण्यासाठी सदस्य व सरपंचपदाचे १८ तर सदस्यपदाचे १२६ इच्छुक उमेदवार आमने-सामने उभे ठाकले आहेत. गावगाड्यातील सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. राजकारणात अनेकांची प्रतिष्ठा पणाला लागली असल्याने गावोगावी तगडी फाइट रंगणार असून, वातावरण आत्तापासूनच टाइट झाल्याचे दिसून येत आहे. सत्तेचे गणित सोडविताना सरपंचपदाचा प्रश्न जटिल होणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. निवडणुकीचा प्रचार करताना कडक इस्त्री केलेले कपडे घालून नेते मतदारांना नमस्कार, रामराम ठोकून मिरवू लागले आहेत. मी मिरवणार अन् सगळ्यांची जिरवणार' जणू काही असा विश्वास त्यांच्या वागण्या-बोलण्यात दिसून येत आहे. एकूणच गावागावांत राजकीय वातावरण तापत आहे.**

गावपातळीवरचे मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीचा उत्साह खेड्यापाड्यात दिसून येऊ लागला. साहजिकच कडाक्याच्या थंडीतही ग्रामपंचायत निवडणुकीचे उष्ण वारे वाहू लागले.

परिणामी पाच वर्षे गुण्यागोविंदाने एकत्र नांदण्याच्या मित्र, आप्तेष्ट आणि भावबंधातच नव्हे, तर घराघरात पुन्हा एकदा ग्रामपंचायत निवडणुकीच्या निमित्ताने आपुलकीपेक्षा अधिक कटुतेची भावना निर्माण होऊ लागल्याचे चित्र गावगाड्यात दिसून येऊ लागले. ग्रामपंचायत निवडणूक म्हटले की, 'गावात कुठे फाईट तर कुठे वातावरण टाईट' अशी स्थिती निर्माण होते. नेत्यांसाठी ग्रामीण भागातील निवडणूक ही सर्वात प्रतिष्ठेची समजली जाते. आता तर राजकीय पक्षांनी या निवडणुकीत लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे ग्रामपंचायत निवडणुका चुरशीच्या होणार हे निश्चित झाले आहे.

सरपंचपदाची निवडणूक यंदा थेट जनतेतून होणार आहे. त्यात बाजी मारण्यासाठी अनेक ठिकाणी गावकुसातील राजकारणात दिग्गज मानल्या जाणाऱ्यांनी प्रतिष्ठा पणाला लावून निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली आहे. उमेदवारी अर्ज सादर करताना शक्तिप्रदर्शन करण्यासोबतच आता इच्छुकांनी मतदारांच्या उंबरठ्यापर्यंत जाऊन त्यांची मनधरणी करणे सुरू केल्याचे पाहावयास मिळत आहे.

ग्रामपंचायत निवडणुकीत राजकीय पक्ष न पाहता, ज्यांची गावात भावकी, गट मोठा आहे. माणसांचे चारित्र्य, आर्थिक परिस्थिती, समाजात पत आपल्या अडीअडचणी कोण कामाला येतात, यावर उमेदवारांचे भवितव्य अवलंबून असते. सध्या राजकारणाचा पाया म्हणून ग्रामपंचायत निवडणुकीकडे पाहिले जाते, त्यामुळे अनेकांनी आपली राजकारणाची सुरुवात ही स्थानिक ग्रामपंचायत निवडणुकीतून केलेली आहे. तर शासनाकडून आता ग्रामविकासासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध होतो. अनेकांनी या निधीच्या माध्यमातून गावांचा चेहरामोहरा बदलला असल्याचे दिसून येते.

हा निधी ग्रामपंचायतीच्या सरपंच व ग्रामसेवक यांच्या खात्यावर येत असल्यामुळे गाव विकासाला मोठी चालना मिळत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात सरपंचपदाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

> सांगोला तालुक्यातील सहापैकी पाच ग्रामपंचायतींच्या सरपंच व सदस्य जोरदार रणधुमाळी सुरू आहे. प्रचाराच्या उमेदवारांच्या कार्यकर्त्यांकडून व्हॉट्सअप, फेसबुक आदी सोशल मीडियावर टीका टिप्पणीद्वारे जोरदार प्रचार सुरू झाला आहे.
>
> सांगोला तालुक्यातील पाचेगाव खुर्द ग्रामपंचायत बिनविरोध झाली तर चिणके सरपंचपद, बालवाडीच्या ११ सदस्यांसह अनकढाळचे तीन सदस्यही अर्ज मागारी घेण्याच्या दिवशी बिनविरोध झाले चिंचोली, शिवणे, अनकढाळ, बलवडी सरपंचपद व सदस्य पदाच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. बोचऱ्यात थंडीत रात्री घरोघरी मतदारांना विनवण्या मतदारराजासमवेत बैठका, चर्चा उर्वरित प्रत्यक्ष गाठी भेटीवरही जोर.. ज्येष्ठ मंडळी, तरुण पारावरच्या गप्पा करताना निवडणुकीचे अंदाज बांधू लागले आहेत. तर उमेदवार त्यांच्या कार्यकर्त्यांनी आपापल्या चिन्हाचा व्हॉट्सअप, फेसबुक सोशल मीडियावर जोरदार प्रचार व प्रसार सुरू केले आहे. सरपंच व सदस्य पदाचे उमेदवार 'होम टू होम प्रचार' करू मतदारांच्या प्रत्यक्ष भेटीगाठी घेत आहेत.

## वेळापूर इंग्लिश स्कूल प्रशालेमधील चार खेळाडूंची विभागीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड

✔ सुराज्य/वेळापूर

पिलीव येथे आर्यमान शूटिंग क्लब यांच्यावतीने घेण्यात आलेल्या नेमबाजी स्पर्धेमध्ये इंग्लिश स्कूल वेळापूरचा कुमार रेहान शेख १४ वर्षे वयोगट पिपसाईट रायफल मध्ये (प्रथम क्रमांक), वैष्णवी बाबर १७ वर्षे वयोगट पिपसाईट रायफल (प्रथम क्रमांक) नंदिनी सर्वगोड १७ वर्षे वयोगट ओपन साईट रायफल (प्रथम क्रमांक),



यशश्री रणदिवे दहा मीटर पिस्टल शूटिंग १७ वर्षे वयोगट द्वितीय क्रमांक या सर्व खेळाडूंची विभागीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे या सर्वांना अक्षय राऊत,

इंग्लिश स्कूल वेळापूर चे मुख्याध्यापक आर. बी. पवार, इंग्लिश स्कूल क्रीडा प्रमुख सतीश कदम, शिवाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

दलित मित्र महाविद्यालय मंगळवेढा अध्यक्ष सुजित (बापू) कदम, संस्था सचिव प्रियदर्शनी महाडिक, उपाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, संस्थेच्या मार्गदर्शिका डॉ. मीनाताई कदम, संस्थेच्या संचालिका तेजस्विनी कदम, इंग्लिश स्कूल वेळापूर स्कूल कमिटीचे चेअरमन प्रतापराव पाटील, रिपाइं माळशिरस तालुका अध्यक्ष व शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष मिलिंद सरतापे, मुख्या. आर. बी. पवार, उपमुख्याध्यापक सुनील खंदारे, पर्यवेक्षक शिवशरण पठान, भास्कर बागल, सत्यजीत बारुंगुळे यांनी अभिनंदन केले आहे.

## हैद्रा येथे यात्रा महोत्सवास सोमवारपासून प्रारंभ

**अक्कलकोट तालुक्यातील हैद्रा येथील हिंदू-मुस्लीम भाविकांचे श्रद्धास्थान असलेले खाजप्पा मुत्या दर्गाचे ८८९ वा यात्रेनिमित सोमवार दि. १९ डिसेंबर ते बुधवार २१ डिसेंबर २०२२ पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १९ डिसेंबर रोजी सून (चिराग), संदल गंध आणि नाटक अन्न दासोह सेवा या सारखे अनेक कार्यक्रम करण्याचे योजिले आहे.**



१९ डिसेंबर रोजी रात्री ११ वाजता कर्नाटकातील करजगी येथील पाटील घरातून गंध हैद्राकडे रवाना होऊन हैद्रा खाजप्पा मुत्या सानिध्यात पहाटे ४ वाजता उपस्थित असते आणि हैद्रा येथील पाटील घरातून ७ वाजता गंध दर्गाकडे रवाना होतो आणि सकाळी ठीक ७.३० वाजता दोन्ही पाटील आणि हैद्रा करजगी येथील मानकरींकडून गंध कार्यक्रम संपन्न होतो. आणि १९ डिसेंबर रोजीच अजय बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्याकडून बसवेश्वर मंदिरजवळ अन्नदासोह आयोजित करण्यात आले आहे व त्याच दिवशी रात्री ९.३० वाजता कन्नड सामाजिक नाटक विरभद्रेश्वर मित्र मंडळाकडून 'केट मेले बुद्धी बंतू' हे नाटक प्रसारित होणार आहे. २० डिसेंबर रोजी रात्री ४० गावातून देवाला वार्षिक दिवा लावण्यासाठी ३० घागर तेल देवाला सर्व मानकरांच्या प्रमुख उपस्थितीत अर्पण करण्यात येते.

यावेळी हैद्रा गावाचे सरपंच नागव्वा पिरप्पा तेली, उपसरपंच बसवराज भीमराव बिराजदार, गंध मानकरी सिद्धाराम माणिकराव पाटील, गुरुनिंगप्पा शिवलिंगप्पा पाटील, विश्वनाथ शंकरराव बिराजदार, संतोष हणमंतराव बिराजदार, चनबसप्पा गुंडेराव बिराजदार, कलप्पा शेटप्पा बिराजदार, दुंडप्पा शेटप्पा बिराजदार, सो चेअरमन विश्वनाथ निंगप्पा कोगनूर, मलकना पिरप्पा कोनूर, श्रीमंत अप्पासाहेब कोगनूर, राजशेखर मलेशप्पा बिराजदार, बसवराज बाबुराव बिराजदार, रामचंद्र बाबुराव बिराजदार, सायबण्णा भोजप्पा करोटी, आनंदराव हणमंतराव करोटी, चंद्रशेखर करोटी. कांतप्पा मारव्या पुजारी, श्रीमंत नाद, नजिर इस्माईल जमादार,राजू फरस, चंदप्पा चांबार उपस्थित होते.

## स्वेरीच्या प्राध्यापकांची औषध कंपन्यांना भेट

✔ सुराज्य/पंढरपूर

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसीच्या तज्ज्ञ प्राध्यापकांनी स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सामंजस्य करार करण्याच्या दृष्टीने खोपोली येथील कोप्रान फार्मास्युटिकल व पुण्यातील सोहम अरोमा या औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना नुकतीच सदिच्छा भेट दिली.



## रेशन कार्डधारकांची नावे मशीनमधून झाली गायब

▶ शंकरराव मोहिते-पाटील स्वस्त धान्य दुकानदार संघटना आक्रमक

✔ सुराज्य/अकलूज

**धान्यवाटपास असलेल्या कार्यालयाकडून शिधापत्रिका डिलीट झाल्याने रेशन कार्डधारकात संतापाची लाट पसरली असून रेशन कार्ड धारक व स्वस्त धान्य दुकानदार यांच्यात ऐन ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत वाद मोठ्या प्रमाणात उफाळू लागले आहेत.**

गेल्या अनेक महिन्यापासून रास्त भाव धान्य दुकानदार यांच्याकडील ई-पॉस मशीन वरून धान्य होत असलेले अनेक कार्ड हे अचानक मागील महिन्यापासून मशीनवरून नाहीसे झाल्याचे चालू महिन्यात निदर्शनास आले आहे. दुकानदारांनी सदरचे कार्ड डिलीट करणेबाबत कोणत्याही प्रकारचे फॉर्म सादर केले नाहीत. तसेच कार्डमध्ये सर्व संबंधिताचे आधार लिंकिंग असताना सुद्धा काही कार्डधारक हे डिलीट झाले आहेत. त्यामुळे दुकानदारकाचे धान्याचे प्रमाण हे कमी झाले आहे. यामुळे डिलीट झालेले कार्डधारक हे नियमित वाटपातील असल्याने ते दुकानदाराकडे धान्य घेण्यासाठी आल्यानंतर धान्य उपलब्ध नसल्याने दुकानदार व कार्डधारक यामध्ये सध्या मोठ्या प्रमाणात वाद निर्माण होत आहे.

याबाबत कार्यालयाकडून अशा प्रकारे कार्ड डिलीट झाल्याने दुकानदाराला त्या कार्डचे धान्य मिळाले नाही त्यामुळे दुकानदार सदरच्या कार्डधारकांना धान्य देऊ शकत नाही. तरी सदर डिलीट झालेल्या कार्डची नावे तात्काळ समाविष्ट करावित. जोपर्यंत सदरचे कार्ड पूर्ववत मशीनमध्ये येत नाही तोपर्यंत दुकानदारांना पूर्वीप्रमाणे शंभर टक्के नियतन मंजूर करून सदरच्या कार्डधारकांना वाटप करण्याची परवानगी मिळावी यामुळे दुकानदार व कार्डधारक यांच्यात वाद निर्माण होणार नाही व धान्य वाटप सुरळीत होईल.

निवेदन तहसील कार्यालय येथे सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील रास्त धान्य दुकानदार संघटना माळशिरस तालुका यांच्यावतीने तालुका अध्यक्ष विजयराव मंडलिक, उपाध्यक्ष दयानंद शेळके, सुभाष शिकारे, सचिव राजेंद्र जाधव, अक्षय मिले, नाना पाटोळे, संजय भगत, श्रीराम जाधव, रणजितसिंह भगत, सुरत साखरे, संजय कोपनर, संजय खराडे, शिवाजीराव लोखंडे, काकडे यांनी दिले आहे.



## संवेदनशील गावात तालुका पोलिसांचे पथसंचलन

✔ सुराज्य/उत्तर सोलापूर

उतर तालुक्यातील १२ ग्रामपंचायतमध्ये निवडणुकीच्या धर्तीवर सोलापूर तालुका पोलीस स्टेशनच्यावतीने पी. आय. नामदेव शिंदे यांच्या नियोजनाखाली पथ संचलन करण्यात आले.

१२ ग्रामंचायतमध्ये मार्डी, करंबा, पाकनी, गावडी दारफळ, कौठाळी, रानमसले, ह्या ग्रामपंचायत संवेदनशील असल्याने मतदान करताना कोणत्याही प्रकारचे अनुचित प्रकार घडू नये म्हणून फेरी काढण्यात आली. एपीआय बंडगर, पीएसआय सुनील बनसोडे, पीएसआय राठोड, ५० पोलीस व महिला पोलिसांनी पथ संचलनात उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर
Classified
वधु-वर विषयक
● वधु - २६, ५.३, गोरी, १२ वी हिंदू मराठा, वडील नाहीत, आई मुलीचे पुजा सामग्रीचे दुकान, शेती ४ एकर, मुलीकरीता सर्वजातीय वर चालेल.
संपर्क : 8378879265
7028536999
(191222)

# 'जेंव्हा धर्माला ग्लानी येते तेव्हा परमात्मा अवतार घेतात'

✔ सुराज्य/नातेपुते

जेव्हा जेव्हा धर्माला लागल्याने येते तेव्हा तेव्हा परमात्मा अवतार घेतात असे कथाकार श्री गुरु भागवताचार्य ह.भ.प. स्वाध्वी प. पू. अनुराधा दीदी यांनी प्रबोधनात्मक बोलत असताना म्हणाल्या.

त्या नातेपुते येथे सद्गुरू श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर यांच्या १०९ व्या पुण्यतिथी सोहळ्याप्रसंगी श्रीमद् भागवत कथाज्ञान यज्ञ श्रीमद्भागवत कथेप्रसंगी बोलत होत्या. यावेळी भागवत कथा झाल्यानंतर सामूहिक आरती घेण्यात आली.

सदर पुण्यतिथी सोहळ्याचा रविवार दि. १८ डिसेंबर रोजी समारंभ होणार आहे. पहाटे ४.३० ते ५.३० अभिषेक पूजा व काकड आरती पहाटे ५ .३० ते ५.५५ सामुदायिक नामस्मरण व श्री रामधून पहाटे ५.५५ वाजता गुलाल व पुष्पवृष्टी सकाळी ६ ते ७ श्री. महाराजांचे दैनंदिन व गुलालाचे प्रवचन निरूपण सकाळी १०.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत महाप्रसाद तसेच सायंकाळी ६ वाजून ७ मिनिट या गोरज शुभमुहूर्तावर सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



तरी समस्त भाविक भक्ताने श्री महाराजांच्या उत्सवामध्ये सहभागी होऊन श्री महाराजांच्या कृपाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सद्गुरू श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर पुण्यतिथी सोहळा समिती नातेपुते यांच्यावतीने करण्यात आले आहे.

पैशाला जर आपण लक्ष्मी समजत बसलो तर खूप अनर्थ आपल्या जीवनामध्ये येतात. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज म्हणायचे, हाती पैका आला त्याने हात काळा झाला. हा दोष नाही पैशाचा त्याला आपण सत्य मानले. पैशाला सत्य मानल्यामुळे अधोगती व्हायला लागली. येणारा पैसा हा आपल्याकडे चांगल्या मार्गाने येणारा असावा वाम मार्गाने येणारा काळा पैसा जर आपणाकडे येत असेल तर त्यास कुठलेही सुख समाधान मिळणार नाही. पुष्कळ संपत्ती, वैभव, धनदौलत दिसेल परंतु त्याने काही सुख प्राप्त होणार नाही. महाराजांनी सांगितले आहे. आपल्या जीवनात जरूर पैसा मिळवावा परंतु तो चांगल्या वैद्य मार्गाने मिळवावा, सद्गुरू श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर पुण्यतिथी सोहळा समिती प्रमुख- धैर्यशील देशमुख यांनी सांगितले.

# राज्यात औद्योगिक वीजवापरात वाढ

## महावितरणचे अध्यक्ष विजय सिंघल यांची माहिती

सुराज्य/मुंबई

**राज्यातील औद्योगिक क्षेत्राच्या वीजवापरात आणि ग्राहकांमध्येही गेल्या काही वर्षांत वाढ नोंदविली गेली आहे. वीजवापराची गेल्या आर्थिक वर्षातील मासिक सरासरी ३,८३३ दशलक्ष युनिटवरून ४,१०१ दशलक्ष युनिटपर्यंत वाढली आहे. त्याचप्रमाणे राज्यातील औद्योगिक वीजग्राहकांची संख्याही वाढली आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिली.**

सिंघल म्हणाले, '२०२१-२२ या आर्थिक वर्षात उच्चदाब औद्योगिक ग्राहकांनी एकूण ३९,३९७ दशलक्ष युनिट वीज वापरली होती. लघुदाब औद्योगिक ग्राहकांनी ६,६०६ दशलक्ष युनिट वीज वापरली होती. एकूण औद्योगिक वीजवापर ४६००३.२६ दशलक्ष युनिट इतका होता. त्यामुळे गेल्या आर्थिक वर्षातील सरासरी मासिक औद्योगिक वीजवापर ३८३३ दशलक्ष युनिट होता. २०२२-२३ या चालू आर्थिक वर्षात राज्यातील औद्योगिक वीजवापरात वाढ झाली आहे.

या आर्थिक वर्षात एप्रिल ते नोव्हेंबर या आठ महिन्यात औद्योगिक ग्राहकांना ३२,८०८ दशलक्ष युनिट विजेची विक्री झाली असून हा वीजवापर मासिक सरासरी



४१०१ दशलक्ष युनिट इतका आहे.

राज्यामध्ये औद्योगिक वीजग्राहकांना वीजदरात विविध प्रकारच्या सवलती दिल्या जातात. विद्युत आकारावर १५ टक्के लोड फॅक्टर' सवलत, ठोक वीजवापर सूट, लवकर वीजदेयक भरल्यास सूट, अति उच्चदाब ग्राहकांना वहन आकारातील बचत, विजेचा वापर रात्री दहानंतर केल्यास दरात सवलत, अशा विविध सवलती दिल्या जातात. अशा सर्व सवलतींचा लाभ घेतला तर उच्चदाब औद्योगिक ग्राहकांना सरासरी ५ रुपये प्रति युनिट दराने वीज आकारणी केली जाते. या खेरीज विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र या विभागातील तसेच 'डी' आणि 'डी प्लस' औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना वीजदरात सवलत दिली जाते, असेही सिंघल यांनी सांगितले.

### एकूण औद्योगिक वीजग्राहक ३.९८ लाख

राज्यातील नवीन औद्योगिक वीजजोड घेणाऱ्या वीजग्राहकांची संख्याही वाढली आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षात राज्यात एकूण उच्चदाब औद्योगिक वीजग्राहक १४,८८५ होते. त्यांची संख्या या आर्थिक वर्षात वाढून नोव्हेंबरपर्यंत १५,०७८ झाली आहे. लघुदाब औद्योगिक वीज ग्राहकांची संख्याही ३,८१,२७२ वरून वाढून ३,८३,२७२ इतकी झाली आहे. नोव्हेंबरअखेर राज्यात एकूण औद्योगिक वीजग्राहकांची संख्या ३,९८,३५० इतकी झाली आहे.

# पोलीस भरतीसाठी १४ लाख अर्ज दाखल

सुराज्य/मुंबई



**राज्यातील १८,३३१ जागांसाठी होणाऱ्या पोलीस भरतीसाठी अर्ज करण्याचा गुरुवार हा शेवटचा दिवस आहे. सात ते सात वर्षांपासून शासकीय मेगाभरती निघाली नसल्याने पोलीस भरतीसाठी बुधवारपर्यंत १४.४७ लाख अर्ज आले होते. या हिशोबाने एका जागेसाठी ८० ते ८५ उमेदवार स्पर्धेत आहेत.**

राज्यात जवळपास ७५ हजार नोकरभरती करण्यात येणार असून त्यामध्ये १८ हजार ३३१ जांगांसाठी पोलीस भरती करण्यात येणार आहे. गेल्या सहा ते सात वर्षानंतरची एवढ्या मोठ्या प्रमाणातील ही पहिलीच भरती असल्याने मुलांनी जोरदार तयारी सुरू केल्याचं दिसून येतंय. अनेक ठिकाणी मैदानातच मुलं व्यायाम करत आहेत, तसेच मैदानावरच उसळ खात असल्याचं चित्र दिसून येतेय. काहीही होऊ दे, पण आता यावर्षी नोकरी मिळवायचीच असा संकल्प करून मैदानावर ही मुले घाम गाळत आहेत.

पोलीस भरतीसाठीच्या १८ हजार ३३१ जागांसाठी जानेवारीत मैदानी आणि १५ ते २० फेब्रुवारीपूर्वी लेखी परीक्षा होईल. उमेदवारांचे जवळपास १५ लाख अर्जांची संख्या पाहता परीक्षांना थोडा वेळ लागू शकतो.

# पारंपरिक बासमतीच्या दरात दहा रुपयांनी वाढ

## घाऊक बाजारातील दर १२५ रुपये प्रतिकिलो

सुराज्य/पुणे

**यंदाचा तांदळाचा नवीन हंगाम सुरू झाला आहे. यंदा पारंपरिक बासमती व हायब्रीड बासमती तांदूळ भावामध्ये वाढ झाली आहे. मागील वर्षापेक्षा सुगंधा व पुसा बासमतीमध्ये दहा टक्क्यांपर्यंत म्हणजे सरासरी दहा रुपये प्रति किलोपर्यंत वाढ झाली आहे. तुकडा बासमतीतील दुबार व तिबारमध्ये पाच रुपये किलो तर मोगरा व मिनी मोगरा तांदळाचे दरही सरासरी पाच ते दहा रुपये प्रति किलोपर्यंत वाढले आहेत.**



तांदळाच्या दराबाबत माहिती देताना, दि पूना मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष आणि तांदळाचे व्यापारी राजेंद्र बाठीया म्हणाले, 'छत्तीसगड, नागपूर, रायपूर (कर्नाटक), गुजरात या भागातून कोलम, वाडा कोलम, चिन्नोर, आंबेमोहर आदी बासमती तांदळाची आवक सुरू झाली आहे. कर्नाटक येथील रायचूर व अन्य जिल्ह्यांतून सोना मसुरी तांदूळ बाजारात येण्यास सुरुवात झाली आहे.' बेळगाव परिसरातील इंद्रायणी व पुणे परिसरातील इंद्रायणी व गावरान आंबेमोहर बाजारात येत आहे. मध्यप्रदेशमधून ११२१, १५०९ बासमती सेला या पूर्वीच बाजारात आला आहे.

हरियाणा, पंजाब व उत्तर प्रदेशमधून ११२१, १५०९, १४०१ पुसा व सरबती तांदूळ बाजारात आला आहे. नवीन पारंपरिक बासमतीची आवक नुकतीच सुरू झाली आहे.

# रस्ता खोदण्यातही लाचखोरी

## नाशिक महापालिकेचा तांत्रिक सहाय्यक अटकेत

सुराज्य/नाशिक : एका ठेकेदाराला रस्ते खोदण्यास परवानगी देण्यासाठी महापालिकेत खाबुगिरी झाल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे.

या प्रकरणी चोवीस हजारांची लाच स्वीकारताना तांत्रिक सहाय्यकाला पकडण्यात आले. अंबड उपविभागीय कार्यालयातील बांधकाम विभागात ही कारवाई झाली. भाऊराव काळू बच्छाव (वय ४५, रा. राणेनगर) असे संशयित तांत्रिक सहाय्यकाचे नाव आहे.

# माझे चेंबर्स जवळपास पेपरलेस : न्या. चंद्रचूड

सुराज्य/नवी दिल्ली

**माझे चेंबर्स जवळजवळ पेपरलेस आहेत, कारण त्यांच्या सर्व नोट्स आणि केस फाइल मला डिजिटल स्वरूपात प्राप्त झाल्या आहेत, अशी माहिती सरन्यायाधीश डॉ. डी. वाय. चंद्रचूड यांनी दिली आहे. मला न्यायालयांकडून कोणत्याही कागदोपत्री फाईल्स मिळत नाहीत. माझे लिपिक मला सर्व नोट्स डिजिटल स्वरूपात पाठवतात आणि माझे चेंबर्स जवळजवळ पेपरलेस आहेत, असे सरन्यायाधीश डॉ. डी. वाय. चंद्रचूड म्हणालेत. ओडिशाच्या १० जिल्ह्यांमध्ये व्हर्च्युअल मोडमध्ये जिल्हा न्यायालय डिजिटायझेशन हब (DCDH) च्या उद्घाटनप्रसंगी आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.**



ओडिशा उच्च न्यायालय रोल मॉडेल असल्याचंही डॉ. डी. वाय. चंद्रचूड यांनी अधोरेखित केलं आहे.

CJI म्हणाले की, उद्घाटन समारंभ हा ओडिशा उच्च न्यायालयाचा गेल्या तीन महिन्यांतील तिसरा कार्यक्रम आहे, जिथे त्यांना सन्माननीय पाहुणे म्हणून निमंत्रित केले आहे.

सरन्यायाधीश डॉ. मुरलीधर यांच्या दूरदृष्टीमुळेच ओडिशा उच्च न्यायालय ई-इनिशिएटिव्हशी व्यवहार करण्याचा न्यायव्यवस्थेसाठी मार्ग मोकळा करेल. तसेच त्यांनी नुकत्याच झालेल्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या परिषदेचा संदर्भही दिला, ज्याचे आयोजन संविधान दिनाच्या समारंभाचा एक भाग म्हणून करण्यात आले होते, जिथे न्याय अधिक सुलभ कसा करता येईल, यावर चर्चा करण्यात आली होती.

# शेतकऱ्यांना समृध्दीची संधी

सुराज्य/नाशिक : थेट खरेदी मान्य नसलेल्या काही शेतकऱ्यांच्या जमिनी समृद्धी महामार्गासाठी भूसंपादन कायद्यान्वये प्रशासनाने संपादीत करण्यात आल्या आहेत. चुकीच्या पद्धतीने मूल्यांकन झाल्याने कमी मोबदला मिळत असल्याचा दावा करीत काही शेतकऱ्यांनी न्यायालयात धाव घेतली आहे.

या दाव्याच्या अंतिम सुनावणीपूर्वी संबंधित शेतकऱ्यांनी रस्ते विकास महामंडळासोबत करार केला तर त्यांना जमिनीच्या मूल्यांकनात आणखी २५ टक्के अतिरिक्त रक्कम देण्याची तयारी महामंडळाने दर्शविली आहे.

# तीन लाख कोटी रुपये वाचवले

## रस्ते प्रकल्पांबाबत गडकरी यांची राज्यसभेत माहिती



सुराज्य/नवी दिल्ली

'रस्ते प्रकल्प प्रलंबित राहिल्यामुळे २०१४पासून बँकांनी दिलेली तीन लाख कोटी रुपयांची कर्जे बुडण्याचा धोका निर्माण झाला होता. मात्र, केंद्र सरकारने वेळीच हस्तक्षेप करून बँकांना मदत केली आणि ही कर्जे बुडण्यापासून वाचवले,' अशी माहिती रस्ते आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी बुधवारी राज्यसभेत दिली.

रखडलेल्या प्रकल्पांपैकी देशाच्या विविध भागांतील ४१५ रस्ते प्रकल्प ९५ टक्के पूर्ण झाले आहेत, असेही गडकरींनी स्पष्ट केले. रखडलेल्या रस्ते प्रकल्पांवर राज्य सरकारकडून देखरेख करण्याची यंत्रणा उभारली जाईल आणि लवकरात लवकर हे प्रकल्प पूर्ण केले जातील, असेही त्यांनी सांगितले. प्रश्नोत्तराच्या तासात गडकरी बोलत होते.

गडकरी म्हणाले, 'सन २०१४ मध्ये जेव्हा आमचे सरकार आले, तेव्हा ३.८५ लाख रुपयांचे प्रकल्प विविध कारणांमुळे बंद होते. मात्र, हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला. आम्ही विविध बँकांशी बोललो आणि त्यातील अनेक अडचणी दूर केल्या. भूसंपादन आणि राज्यांच्या अखत्यारीतील विषयही आम्ही पुढे नेले. बँकाच्या बुडीत कर्जापैकी तीन लाख कोटी रुपये आम्ही वाचवले. कोरोनाच्या काळात काही प्रकल्पांना मुदतवाढ देण्यात आली होती. आता असे प्रकल्पही रखडलेल्या प्रकल्पांच्या यादीत आले आहेत. कंत्राटदारांकडून किंवा आमच्या नियंत्रणाबाहेरील इतर मुद्द्यांसह विविध कारणांमुळे प्रकल्पांना विलंब झाला आहे. आम्ही तीन महिन्यांच्या आत अपूर्ण असलेल्या आणि लांबणीवर पडलेल्या सर्व प्रकल्पांवर राज्यनिहाय देखरेख करू आणि लवकरात लवकर हे प्रकल्प पूर्ण करू. संरक्षण आणि पर्यावरण विभागाकडून येणारी मंजुरीही लवकरात लवकर मिळेल यासाठी प्रयत्न केले जातील.'

# कोरोना लसीकरणाकडे औरंगाबादकरांचे दुर्लक्ष

## डोस मुदतबाह्य होण्याची भीती

सुराज्य/औरंगाबाद : कोरोना लसीकरणाकडे नागरिकांनी पाठ फिरवली आहे. गेल्या तीन महिन्यांत केवळ ५४३ जणांनीच लस घेतली.

महापालिकेकडे सध्या कोव्हॅक्सिन लशींच्या सोळा हजार डोसचा साठा असून, या लशींच्या डोसच्या वापरासाठीची अंतिम तारीख ३१ डिसेंबर आहे. लसीकरणासाठी नागरिकांनी पुढाकार न घेतल्यास वर्षाच्या अखेरीस लशींचा साठा निश्चित मुदतबाह्य होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगातच पदे रिक्त, पाच हजार मुलाखती रखडल्या

सुराज्य/पुणे

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या पाच हजार मुलाखती रखडल्या आहेत. मुलाखती होत नसल्याने दीड ते दोन वर्ष वाया गेली आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगावर सदस्यसंख्या कमी असल्याने मुलाखती रखडल्या असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. सहापैकी तीनच सदस्य सध्या काम पाहत आहेत.

एमपीएससीची मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी तज्ज्ञांचे पॅनल तयार केले जाते. या पॅनलमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील एक सदस्य सहभागी असतो. सध्या तीनच सदस्य असल्याने केवळ तीनच पॅनल तयार होऊ शकतात. त्यामुळे मुलाखतींना वेळ लागत असल्याची माहिती मिळत आहे.

आधीच पाच हजार उमेदवारांच्या मुलाखती रखडल्या असून आता पुन्हा नव्याने परीक्षा होत आहेत. त्यामुळे या परीक्षांच्या मुलाखतींचीही यात भर पडणार आहे. त्यामुळे सरकारने आयोगाचे सर्व सदस्य भरावेत आणि मुलाखती घ्याव्यात, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे.

# यादवच्या फिरकीपुढे बांगलादेशने टाकली नांगी

सुराज्य/नवी दिल्ली

**झहूर अहमद चौधरी स्टेडियम चट्टोग्राम येथे भारत विरुद्ध बांगलादेश पहिला कसोटी सामना खेळला जात आहे. या कसोटी सामन्यातील आज दुसरा दिवस आहे. भारताने आपल्या पहिल्या डावात ४०४ धावा केल्या आहेत. तसेच बांगलादेशच्या पहिल्या डावात दुसऱ्या दिवसाच्या समाप्तीपर्यंत ४४ षटकांत ८ बाद १३३ धावा केल्या आहेत. त्यामुळे बांगलादेश संघ अजूनही २७१ धावांनी पिछाडीवर असल्याने अडचणीत सापडला आहे.**



बांगलादेश संघाला पहिला धक्का नजमुल हुसेन शांतोच्या रुपाने बसला. तो संघाचे आणि स्वत:चे खाते उघडण्याअगोदर बाद झाला. त्याच्या पाठोपाठ यासिर अली देखील ४ धावा काढून बाद झाला. त्यामुळे बांगलादेश संघ अडचणीत आला. त्यानंतर २४.२ षटकात बांगलादेशचा निम्मा संघ तंबूत परतला होता. तेव्हा संघाची धावसंख्या ७५ अशी होती. दरम्यान यानंतर ही संघाची पडझड सुरु राहिल्याने संघ दबावात सापडला.

# जगासाठी पुढील वर्ष अधिक आव्हानात्मक : रघुराम राजन

सुराज्य/नवी दिल्ली : येणारे पुढील वर्ष हे भारतासाठी नव्हे तर जगातील अर्थव्यवस्थेसाठी अधिक आव्हानात्मक असणार असल्याचा इशारा भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर आणि अर्थतज्ज्ञ रघुराम राजन यांनी दिला. देशाच्या आर्थिक विकासासाठी अनेक प्रकारे सुधारणा कराव्या लागणार असल्याचे त्यांनी म्हटले. निम्न मध्यमवर्गीयांना केंद्रीत करून काही धोरणे आखणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले.

रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन हे बुधवारी, भारत जोडो यात्रेत सहभागी झाले होते. त्यानंतर राहुल गांधी यांच्यासोबत चर्चा करताना देशासमोरील आर्थिक आव्हानांचा उहापोह केला. रघुराम राजन यांनी म्हटले की, कोरोना महासाथीच्या काळात मध्यमवर्ग, निम्न मध्यमवर्गाला मोठा फटका बसला. या वर्गाला विशेष लक्षात घेऊन धोरण आखणे गरजेचे आहे. लघु उद्योग आणि मध्यम आकाराच्या उद्योगांसाठी अनुकूल वातावरण तयार करण्याची आवश्यकता असल्याचे सांगत त्यांनी हरीत ऊर्जा वापरावरही भर दिला.

# 'वंदे भारत'वर फेकले दगड

सुराज्य/नागपूर : सेमी हाय स्पीड ट्रेन वंदे भारत एक्सप्रेस नागपूर ते बिलासपूर दरम्यान धावू लागली आहे. गेल्या रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज रेल्वेगाडीला नागपूर येथे हिरवा झेंडा दाखवला होता.

अशाप्रकारची ही देशातील सहावी रेल्वेगाडी तर मध्य भारतातील पहिलीच गाडी आहे. ही गाडी नागपूर-बिलासपूर हे ४१२ किलोमीटरचे अंतर केवळ साडेपाच तासात कापते. वंदे भारत एक्सप्रेस संपूर्णपणे वातानुकूलित असून पुढील स्थानकाची माहिती देणारी 'डिजिटल स्क्रीन' बसवण्यात आली आहे. या गाडीत खानपानची देखील सुविधा आहे. ही गाडी आठवड्यातून सहा दिवस धावते. केवळ शनिवारी ही गाडी धावत नाही.

आरामदायी प्रवासासाठी ओळखली जाणारी वंदे भारत एक्सप्रेसवर छत्तीसगड येथील दुर्ग ते भिलाई स्थानकादरम्यान अज्ञात व्यक्तीने दगड फेक केली. त्यामुळे या गाडीच्या एका खिडकीचे काच फुटले याबाबत दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी साकेत म्हणाले, 'अज्ञात व्यक्तीने धावत्या गाडीवर दगड फेकला असावा. त्याची चौकशी रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ) करीत आहे.'

# सरकारचे एक पाऊल मागे

## आंतरजातीय नव्हे तर आंतरधर्मीय विवाहांसाठी समिती काम करणार



सुराज्य/मुंबई

**महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागातर्फे १३ डिसेंबरला आंतरजातीय आंतरधर्मीय विवाह परिवार समन्वय समिती स्थापन करण्यात आल्याची घोषणा केली होती. या समितीच्या घोषणेनंतर मोठा वादंग निर्माण झाला होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी या संदर्भात राज्य सरकारच्या निर्णयावर टीका केली होती. राज्याचे महिला व बाल विकास विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी ही समिती आंतरधर्मीय विवाहासंदर्भात असल्याचं म्हटलं होतं. आज महिला व बाल विकास विभागाकडून नवा शासन निर्णय काढण्यात आला आहे. याशिवाय १३ डिसेंबरला जाहीर करण्यात आलेल्या समितीमधील योगेश देशपांडे यांनी यासंदर्भात नकार दिल्याने त्यांच्या जागी दुसऱ्या सदस्याची नियुक्ती करण्यात आली आहे.**

### आंतरजातीय शब्द वगळला आता आंतरधर्मीय

राज्य सरकारने काही दिवसांपूर्वी आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह समन्वय समिती जाहीर केली होती. यात बदल करण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने जाहीर केला आहे. आता फक्त आंतरधर्मिय विवाहांसाठीच ही समिती काम करणार आहे, तसा बदल करत नवा शासन निर्णय राज्य सरकारने जाहीर केला आहे. त्याशिवाय यासाठी हेल्पलाईनची घोषणाही केली आहे.

इरफान अली पिरजादे या नव्या सदस्यांचा समावेश या समितीत करण्यात आला आहे. नांदेडच्या ॲड. योगेश देशपांडे यांना त्यांच्या मागणीवरुन समितीतून मुक्त करण्यात आलं आहे. त्यांच्या ठिकाणी मुंबईच्या इरफान अली पिरजादे यांचा समावेश करण्यात आला आहे.

### जितेंद्र आव्हाड यांच्याकडून समितीवर आक्षेप

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी ट्विट करुन राज्य सरकारच्या या निर्णयावर टीका केली. पुरोगामी महाराष्ट्राला २०० वर्ष मागे नेण्याचा डाव असल्याचा आरोप केला. आंतरजातीय/धर्मीय लग्नांची मोजदाद करण्याचा सरकारला काय अधिकार आहे?, असा सवाल आव्हाड यांनी केला होता.

### हा निर्णय संविधानविरोधी


कुणाशी विवाह करायचा ही प्रत्येकाची खाजगी बाब आहे. सरकारने हे पाऊल तातडीने मागे घ्यावे. जातीव्यवस्था म्हणजेच चातुरवर्ण व्यवस्था मजबूत करण्यासाठी हे काम चालू आहे.

सदरच्या परिपत्रकाची चर्चा करीत असताना सदरचे परिपत्रक हे संविधान विरोधी आणि मूलभूत अधिकारांवरती अतिक्रमण करणारे आहे. नशीब अजून सरकार हे सांगत नाही कि आम्ही कुंडल्या जमवून बघू आणि मग त्यानंतर होकार किंवा नकार कळवू. हे सरकार आहे की विवाह नोंदणी कार्यालय, असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला होता.

## विकासाच्या टेकऑफसाठी विमानसेवेचे लँडिंग आवश्यक

# राजनकन्या ऋतुजा पाटीलची हवाई सफर

विमानसेवा सुरू नसलेल्या सोलापूर जिल्ह्यातील एक कन्या पायलटचे स्वप्न पाहू शकते, हीच मोठी पॉझिटिव्ह बाब आहे. केवळ स्वप्न न पाहता ते स्वप्न युके आणि कॅनडातून शिक्षण पूर्ण करून साकारण्याची किमया 'राजन कन्या' अर्थातच ऋतुजा राजन पाटीलने करून दाखवली आहे. फॉरेनच्या या पायलटच्या हवाई सफरीचा प्रवास तितकाच रंजक आणि प्रेरणादायक आहे, हे त्यांच्याशी अनगरवरच्या बंगल्यात झालेल्या गप्पांमधून उलगडत गेला. मोहोळच्या राजकारणातील एक्का असणारे माजी आमदार राजन पाटील यांच्या बंगल्यावरील गप्पांमध्ये राजकीय चर्चांना बायपास करत केवळ पायलटच्या नजरेतून सोलापूर शहराच्या विकासावर टाकलेला दृष्टिक्षेप आणि एक कन्या पायलट म्हणून आकाशात भरारी घेताना आलेले अनुभव या साऱ्या गोष्टी आजच्या नव्या पिढीला भरारी घेण्यासाठी गरजेच्या वाटतात.











आपली लहानपणापासूनच खूप मोठ मोठी स्वप्ने असतात, कुणाला डॉक्टर, कुणाला इंजिनियर, कुणाला शिक्षक, कुणाला पायलट, कुणाला वैज्ञानिक, कुणाला उद्योजक व्हायचे असते, पण ते स्वप्न कसे साकार करायचे हेच कळत नसते. कारण ती स्वप्ने साकार करण्यासाठी काय करावे, कोणते शिक्षण घ्यावे हेच त्यांना माहीत नसते त्यामुळे त्यांची स्वप्ने अपूर्ण राहतात. पण नजरेत स्वप्न आणि पाठीशी आई-वडील भक्कम उभे असली की गगनात भरारी घेणे अवघड नसते, हेच पायलट ऋतुजा पाटीलने दाखवून दिले आहे.

पायलट बनून आकाशात भरारी घेण्यासाठी पंख मिळाले असले तरी पाय जमिनीवर ठेवत संस्कारचे बीज याच मातीतून मिळाले असल्याची जाणीव ठेवणे हे यशाचे पहिले गमक ऋतुजा पाटील यांना गवसल्याचे प्रथमदर्शनीच जाणवत होते. फॉरेन रिटर्न्स या दोन शब्दातच अंगावरचे मास दस पटीने वाढत असते. डोक्यात अहंमभावाचा इगो डिस्को करतो किंवा तसे करण्यास पोषक वातावरण असते. मात्र सहा-सात वर्ष परदेशात राहूनही स्पर्धेच्या युगात परदेशी कल्चर उपयोगाचे असले तरी जीवनात जगण्यासाठी आणि यशस्वी होण्यासाठी भारतीय संस्कृतीला तोड नाही, याची जाण या राजकन्येला आहे. म्हणूनच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी परदेशातील शिक्षणाचा उपयोग होत असला तरी संस्कार आणि आपलेपणाची परंपरा केवळ भारतातच असल्याचे ऋतुजा पाटीलने अगदी नेमक्या शब्दात सांगितले.

### कमी वयात जास्त देशांची सफर

जिना यहाँ मरना यहाँ.. एवढ्या वाक्यातच कित्येकांचे आयुष्य सरतात मात्र ऋतुजा पाटील तारुण्यातच आपल्या वयापेक्षा जास्त म्हणजेच ३५ देशांची सफर कमी वयात पूर्ण केली आहे. त्यामुळे जगाच्या कल्चरची ओळख होण्यास मदत झाली असून त्यातूनच जगभर फिरण्याचा छंद जडला आहे.

### राजकारणाच्या 'रनवे'वर नो 'फ्लाईंग'

वडील राजकारणात एक मोठे प्रस्थ आहेत. किंग म्हणून आणि किंगमेकर म्हणून त्यांनी आजपर्यंत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. असा घरातच राजकारणाचा 'रनवे' खूप चांगला असताना देखील आपणाला राजकारणात इंटरेस्ट नाही. त्यामुळे या राजकारणाच्या 'रनवे'वर भविष्यातही कधी 'फ्लाईंग' करण्याची इच्छा नसल्याचे सांगत पायलट ऋतुजा पाटीलने राजकारण आवडीचा विषय नसल्याचे सांगितले.

### पुणे-नागपूर हवाई सफरमध्ये मी एक स्वप्न पाहिले

वडील आमदार असल्याने ते नागपूरला हिवाळी अधिवेशनात सहभागी होण्यासाठी गेले होते. त्यांच्याकडे जात असताना आईसोबत मी पुणे- नागपूर प्रवास विमानाने केला. त्यावेळी मी सातवीत होते. हवाई सफर करत असताना पायलट ही एक महिला होती. तिला पाहून तेव्हाच स्वप्नाचे पहिले बीज रोवले गेले. आई मलाही या महिलेप्रमाणे पायलट व्हायचंय, असं आई-वडिलांना बोलून दाखवले आणि पुढे या स्वप्नाचा पाठलाग करताना सर्वांच्या सहकार्याने स्वप्न सत्यात उतरले, असे ऋतुजा पाटीलने अभिमानाने सांगितले.

### बिझनेस वूमन बनण्याचे टार्गेट

पायलट झाल्यानंतर कुठल्या तरी ऐअर लाईन्सला जॉईन होऊन गेलेलठ्ठ पगार पदरात पाडून घ्यावा आणि सेटल व्हावं, हा चाकोरीबद्ध विचार ऋतुजा यांना कधी शिवलाच नाही. त्यांना पायलटच्या कौशल्याचा वापर फक्त छंद जोपासण्यापुरता करायचा आहे. तर भविष्यात एक बिझनेस वुमन म्हणून पुढे यायची इच्छा त्यांची आहे. त्यामुळे पायलटकडे त्या करिअर म्हणून पाहत नसून केवळ देशभर फिरण्याच्या आपल्या छंदाला जोडणारा दुसरा छंद समजतात.

- **आवडीचे देश :** युके आणि स्पेन
- **भारतातील आवडीची बाब :** भारतीय कल्चरमधील सर्वांना जोडून ठेवणारी कुटुंब पद्धती



### फिरायला परदेश - राहायला स्वदेश

परदेशातील विविध देश खूप पुढारलेली आहेत. तंत्रज्ञानाच्या दृष्टीने व इतर प्रगती झालेले देश आहेत. अशा देशांना भेटी देऊन त्यांच्याकडील चांगल्या बाबी शिकल्या पाहिजेत. त्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी फिरायला परदेशातील देश आवडतात मात्र राहायला भारत देशच चांगला असून भारतातच राहणार असल्याचे ऋतुजा या ठाम आत्मविश्वासाने सांगतात.

**भारतात आवश्यक असणारी बाब**

- जेंडर इक्व्यालिटी
- टॅलेंटचा सन्मान
- महिलांचा सन्मान

**भक्कम आधार..माझा परिवार!**



**शिक्षण :** माध्यमिक शिक्षण सेंट हेलन हायस्कूल पुणे येथे तर महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन कॉलेजमध्ये झाले आहे. बीएससी मॅनेजमेंट शिक्षण इंग्लंड येथे तर कर्मशिअल पायलेट फॉर एअरोप्लेनचे शिक्षण कॅनडा येथे पूर्ण केले आहे.

### पायलटच्या नजरेतून....

विमान टेकऑफ आणि लँडिंग करत असताना वेळ आणि पिक पॉईंट महत्त्वाचा असतो. कोणत्याही परिस्थितीत तो मिस करून चालत नाही. त्यामुळे तो मिस झाल्यास विमानाला पुन्हा चक्कर मारून तो पॉईंट पकडावा लागतो. त्यामुळे टेक ऑफ घेत असताना आणि लँडिंग करत असताना विमान सेवेच्या परिघात कुठलेही अडथळे असू नयेत, हा नियम जगाच्या पाठीवर सर्व विमानतळे पाळत असतात.

**शब्दांकन : विजय गायकवाड**




## स्पर्धेत टिकायचे तर विमानसेवा आवश्यकच...

आजचे युग फास्ट झालेले आहे. प्रत्येक गोष्ट वेगवान झालेली आहे. अशा परिस्थितीत स्पर्धेच्या युगात टिकून राहायचे असल्यास तो वेग आत्मसात केला पाहिजे. कोणत्याही शहराचा आणि देशाचा विकास होण्यासाठी त्या भागात विमानसेवा असणे अत्यावश्यक आहे. विमानसेवा असल्याशिवाय त्या शहराचा विकास होणे शक्य नाही. विमानसेवा असल्यास केवळ प्रवासच वेगवान होतो असे नाही तर विमानसेवेतून ट्रान्सपोर्टची कामे जलद गतीने होऊ शकतात. सर्वात सुरक्षित आणि ट्रान्सपोर्टची व्यवस्था विमानसेवेच्या माध्यमातून होऊ शकते. त्यामुळे ज्या भागाची प्रगती साधायची आहे त्या भागात विमानसेवा असणे आवश्यक आहे. त्याला दुसरा पर्याय नाही, असे त्या ठामपणे पायलटच्या नजरेतून सांगत होत्या.